गुरुवार, २८ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १३५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 28 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-135 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05

# पंजाबरावांचे व्हिजन शरद पवारांकडे

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे गौरवोद्गार

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती : पंजाबरावांची तळमळ, व्हिजन ही शरद पवार यांच्याकडे आहे. राजकीय धुळवड सुरू असते. मात्र या राजकीय धुळवडीत डॉ. पंजाबराव देशमुख, शरद पवार यांच्या सारख्या नेत्यांचे नाव, कार्य सामान्यांच्या कायम लक्षात राहते, असे गौरवोद्गार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी काढले.**

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त त्यांच्या सन्मानार्थ भारत सरकारने 125 रुपयांचे नाणे जारी केले. त्या नाण्याचे लोकार्पण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. त्याशिवाय माजी केंद्रीय कृषी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाचा पुरस्कार शिवाजी शिक्षण संस्थेच्यावतीने देण्यात आला. त्या कार्यक्रमात गडकरी बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना गडकरी म्हणाले की, विविध क्षेत्रातील गुणवत्ताधारकांच्या पाठिशी कोणताही पक्षीय अभिनिवेश न बाळगता पाठिशी उभं राहणारे महाराष्ट्राचे नेतृत्व म्हणजे शरद पवार असल्याचे केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांनी म्हटले. पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्रात मोठे नाव आहे. शरद पवार यांचेही मोठे नाव आहे. डॉ. पंजाबराव देशमुखांच्या नावाने शरद पवार यांना पुरस्कार देण्यात आला आहे. त्यामुळे आता पुरस्काराने आणखी मोठी उंची गाठली आहे. पण, शरद पवार यांच्या उंचीची माणसे दरवर्षी कुठे मिळणार आहेत.

राजकारणाचा अर्थ दुर्दैवाने सत्ताकारण असा करण्यात आला आहे. राजकारण म्हणजे राष्ट्राकारण, समाजकारण, विकासकारण, धर्मनीती आहे. राजकारण हेच समाजकारण आहे, असे समजून कृषी क्षेत्रासाठी, शिक्षण, सांस्कृतिक कला, क्रीडा या सगळ्या क्षेत्रांसाठी आणि त्यातील गुणवत्ताधारकांच्या पाठिशी कोणताही पक्षीय अभिनिवेश न बाळगता पाठिशी उभे राहणारे महाराष्ट्राचे नेतृत्व म्हणजे शरद पवार, असे उद्गार नितीन गडकरी यांनी काढले.

मोठ्या शहराची लोकसंख्या वाढत चालली आहे.. यात ग्रामीण भागाचे लोकं आता शहराकडे स्थलांतरीत होत आहेत. विकासाचे मूल्यमापन हे शेतीतून किती आणि इतर क्षेत्रामधून किती हे पाहून होते. गावातील शेतकऱ्याचा विकास झाला पाहिजे, या भावनेतून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी त्यावेळी कार्य केलं असल्याचे गडकरी यांनी म्हटले. शेती प्रगत नव्हती तेव्हा डॉ पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी खूप कार्य केले. राजकारणी माणूस हा पाच वर्षांचा विचार करतो पण डॉ. पंजाबराव देशमुख यांनी भविष्याचा विचार केला. आपला शेतकरी आता ऊर्जादाता झाला आहे. शेतकरी आता डांबर पण तयार करत असल्याचे गडकरी यांनी म्हटले.




# सावध.... ऐका पुढल्या हाका..!

आधुनिक केसरी

*थंडीच्या सुखद गारव्यात करूया स्वागत नववर्षाचे*
*मित्र मैत्रिणी आप्तेष्टांसवे जमवू मैफिलसत्र जल्लोषाचे*

असो कोणता धर्म, जात, पंथ, संप्रदाय नवीन विचारांनी नवीन संकल्पांने नववर्षाचे स्वागत करताना आपण सर्वजण एकरूपतेने, एकजुटीने, एकोप्याने एकत्र येत आहोत. नव्याचे आपण नेहमी स्वागत करत आलो आहोत. परिवर्तन हा सृष्टीचा नियमच आहे आणि तो सर्वांना मान्य करावा लागतो. काळ बदलतो तसे विचार बदलतात. रोजचा दिन काहीतरी नवीन बरोबर घेऊन उगवतो आणि जुन्या घटनांना बुडवून नवीन प्रभात घेऊन जन्मास येतो. म्हणूनच तुतारी या कवी केशवसुत म्हणतात "जुने जाऊ द्या मरणालागूनी, जाळुनी किंवा पुरुनी टाका, सडत न एक्या ठायी ठाका, सावध! ऐका पुढल्या हाका". निसर्गाकडून नेहमीच माणसाला काहीतरी नवीन शिकायला मिळत असते. आपण उगवता आणि मावळता सूर्य नेहमीच पाहतो. तो आपल्याला नेहमीच सतेज दिसतो परंतु तो काहीतरी सांगत असतो, "अरे माणसा, मला नुसता पाहू नकोस. माझ्याबरोबर माझ्या वेगात, माझ्या चर्येत, माझ्या तेजात एकरूप होऊन जा. बघ तू उठला नाहीस तरी मी उठलो. आधीच दिवसांचा, विचारांचा, प्रसंगी आलेल्या रागांचा त्याग करून पुन्हा नवतारुण्य, नवचैतन्य धारण करून प्रकाशाच्छित अवस्था मी प्राप्त करून घेतली आहे. तर तू ही माझ्याबरोबर उठ, जुने राग, लोभ, द्वेष, क्रोध, मत्सर विसरून जा आणि नवशक्तीने प्रसन्न होऊन चालू लाग. हातून घडलेल्या कर्मात नातं साठव. त्याचे तोल मापन कर आणि प्रसन्नतेने माझ्याबरोबर चालत रहा. रात्र वैऱ्याची आहे, तुझ्या मनात वाईट विचार येऊ देऊ नकोस. हा रात्रीचा अंधकार तुझ्या चैतन्याला, तेजाला गिळून टाकेल. तुझा तो सर्वनाश करेल तेव्हा तू अंध:कारावर विजय मिळव. दिवस जसा सोन्याचा श्रमाचा घालवला तशी रात्रदेखील सुखात श्रमपरिहार करण्यात जावू दे. क्षणिक काळाबरोबर विसंगती चाखून पुन्हा माझ्यासोबत दुप्पट तेजाने, चैतन्याने संकल्पपूर्तीच्या उत्साहाने चालू लाग".



सौ. भारती सावंत
संपर्क क्र. 9653445835

किती छान होते २०२३ साल! मागील दोन वर्षांचे कोरोनाचे संकट टळले असून लोकांना पूर्वीसारखे स्वच्छंदी जीवन जगण्यासाठी आता बळ मिळाले होते. पूर्ववत जीवन सुरू झाल्यामुळे लेकरांचे चेहरे प्रफुल्लित झाले होते. बागा, मैदानें मुलांनी, लोकांनी फुलून गेले होते. कोरोना काळात मनावर जे दडपण होते ते संपूर्ण नाहीसे झाले होते. दोन वर्षात शालेय नुकसान झालेले भरून काढण्यासाठी शाळकरी आता अभ्यासाला लागलेले होते. ज्यांच्या घरातील कर्तेसवरते कोरोनाने हिसकावून नेले होते ते आपल्या दुःखातून सावरून जाऊन आताशी आपले जीवन व्यतित करण्याचा प्रयत्न करत होते. नवनवीन तंत्रज्ञान, नवीन धरणे, नवीन पूल, रस्ते, इमारती तसेच मेट्रोचे उद्घाटन, पुस्तकांचे स्टॉल्स, कवी संमेलने, साहित्यिक मेळावे, सहली अशी अनेक ठिकाणे नवनव्या कार्यक्रमांनी , प्रसंगांनी सुरळीत चालू झाले होते. मॉल्स, चित्रपटगृहे, हॉटेल्स या ठिकाणी खेळीमेळीच्या वातावरणात आम्ही आता पूर्वीसारखे डुबून गेलो होतो.

या २०२३ सालाला आता लवकरच निरोप देणार आहोत. नाताळचा आनंद साजरा करून आम्हाला गतवर्षात आम्ही खूप काही कमावले, गमावले हे सांगताना मन भरून येत आहे. आम्हाला जो पूर्ववत आनंद मिळवून देणारे हे २०२३ साल इतक्या पटकन निघून गेले की ३६५ दिवस कसे संपले तेही कळाले नाही. हल्ली लग्न, वाढदिवस, बारशी अशा अनेक कार्यक्रमांनी मानवी मनाला तजेला मिळवून दिला आहे. दोन जीवांचे मिलन झाल्यानंतर त्यांच्यात बरसणारा आनंद द्विगुणित होत आहे. करिअरचे उद्दिष्ट लक्षात ठेवून मुले त्या दृष्टीने भवितव्याची वाटचाल करण्यात गुंतली आहेत. मागील दोन वर्षात सर्वच प्रकारे नुकसान झाले असल्यामुळे त्याची भरपाई करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आता नवीन २०२४ साल येत आहे. त्याच्या स्वागतासाठी सर्व लहान थोर जय्यत तयारीला लागलेले आहेत. विविध ठिकाणी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे, समारंभाचे, काव्यमैफिलींचे आयोजन, प्रयोजन होत आहे. लग्न सोहळे धुमधडाक्यात साजरे होत आहेत. नवीन वर्षाचे स्वागत जल्लोषात करण्यासाठी तरुणाई प्रतिक्षेत आहे. पर्यटनस्थळे, हॉटेल्सचे बुकिंग होत आहे. चला आपणही सूर्याप्रमाणे तेजस्वी होऊन मोठ्या जल्लोषात नवीन वर्षाचे स्वागत करूया आणि नव्या संकल्पांची पूर्ती करण्यासाठी प्रयत्नशील राहू या.



सरकारच्या धोरणांमुळे बळीराजा अडचणीत आला आहे. शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व त्यांच्या विविध मागण्या आणि प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी बुधवारपासून खा. अमोल कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली किल्ले शिवनेरी ते केंदूर दरम्यान शेतकरी आक्रोश मोर्चाला सुरुवात झाली.


# छगन भुजबळ यांना काळे झेंडे दाखवणारे मराठा कार्यकर्ते व नामांकित वृत्तवाहिनीच्या प्रतिनिधीवर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** दि.२५ डिसेंबर २०२३ रोजी मराठा कार्यकर्त्यांनी छत्रपती संभाजीनगर नाशिक महामार्गावरील भरवस फाटा येथे ना.छगन भुजबळ यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवले होते. याची एक नामांकित वृत्तवाहिनीने ठळक बातमी दाखवली होती. त्यामुळे मंत्री भुजबळ यांची जाणून बुजून बदनामी केली म्हणून लासलगाव पोलीस ठाण्यात मराठा कार्यकर्ते व वृत्तवाहिनीच्या प्रतिनिधी विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अनिल अरंविद विंचुरकर, वय ४२ वर्ष, व्यवसाय नोकरी, रा. सिंध्दार्थ कॉलनी, विंचुर, यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.२५ डिसेंबर २०२३ रोजी १२.४५ वाजता चे सुमारास मा. छगनराव भुजबळ साहेब हे नाशिक येथुन येवला येथे संपर्क कार्यालयामध्ये जाणार असल्याने मी विंचुर त्रिफुली या ठिकाणी उभा होतो. त्यावेळी त्या ठिकाणी आमचे विंचुर येथील सरपंच सचिन दरेकर, माजी पं.स.सदस्य विलास गोरे, पांडुरंग राऊत व लासलगाव येथील उमेश पारीख हे देखील उपस्थित होते. तेव्हा उमेश पारीख यांना फोन आला, फोनवर बोलणारी व्यक्ती ही एक नामांकित वृत्तवाहिनी चे प्रतिनिधी चेतन कोळस यांचा आवाज येत होता. त्यावेळी चेतन कोळस हे उमेश पारीख यांना म्हणाले की, ' तु कुठे आहे, भरवस फाटा या ठिकाणी कोणी नाही का, मी लोकांना फोन केलेले आहे. तु त्या ठिकाणी ये' असे उमेश पारीख यांना फोनवर बोलल्याचे आम्ही ऐकल्याने मी लागलीच विंचुर येथुन निघुन भरवस फाटा या ठिकाणी जात असतांना मला रस्त्यामध्ये भुजबळ साहेबांचे कार्यकर्ते माधव रामभाऊ जगताप, रा. मरळगोई हे भेटले. मी त्यांचेसह भरवस फाटा या ठिकाणी गेलो. त्यावेळी तेथे चेतन कोळस हे उपस्थित होते व ते त्या ठिकाणी आलेल्या डॉ. सुजित गुंजाळ, गोपीनाथ ठुबे, सुरेश ठुबे, प्रसाद फापाळे, प्रतिक ठुबे, अमित मुदगुल, राजेश भडांगे, सुशांत भोसले, संतोष साळवे ह्या लोकांना भुजबळ साहेब हे विंचुर बाजुकडुन येत असले बाबत सांगुन भुजबळ साहेब हे भरवस फाटा या ठिकाणाहून जाते वेळी भुजबळ साहेब यांना काळे झेंडे दाखवुन निदर्शन करा असे सांगत असतांनाच त्या ठिकाणाहुन भुजबळ साहेब हे त्यांचे वाहनामध्ये १.१५ चे वा.चे सुमारास येवल्याचे दिशेने जात असतांना त्यांना वरील लोकांनी काळे झेंडे दाखवुन निदर्शन केले. त्यावेळी तेथे असलेले चेतन कोळस यांनी फोटो व चित्रीकरण करुन त्याची बातमी करुन भुजबळ साहेब यांची बदनामी केली म्हणुन माझी चेतन कोळस, रा. येवला व त्यांचे सांगणे वरुन निदर्शन करणारे डॉ. सुजित गुंजाळ, गोपीनाथ ठुबे, सुरेश ठुबे, प्रसाद फापाळे, प्रतिक ठुबे, अमित मुदगुल, राजेश भडांगे, सुशांत भोसले, संतोष साळवे यांचे विरुध्द फिर्याद आहे. त्यांचे फिर्यादीवरून आंदोलक व वृत्तवाहिनी प्रतिनिधी यांचे विरोधात भारतीय दंड संहिता १८६० चे १०९, १४३, १४९, ५०० नुसार गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत स.पो.नि.राहुल वाघ अधिक तपास करीत आहेत.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

याच भावनेतून लाखो पुणेकर आणि अन्य प्रांतातील लोकही येथे एकत्र येऊन जाती, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन रामरायासाठी वस्त्र विणत आहेत. हे एक आगळेवेगळे राष्ट्रभक्तीचे, रामभक्तीचे उदाहरण आहे असे म्हणायला हरकत नाही. या सगळ्या गोष्टींमुळे २०२३ या वर्षाचा डिसेंबर महिना यानिमित्ताने निश्चितच माझ्याच काय परंतु समस्त पुणेकर आणि पुस्तकप्रेमी मंडळींच्या लक्षात राहील. आपण विविध महोत्सव साजरे करतो पण हा एकाच छताखाली साजरा होणारा हा पुस्तक महोत्सव अनेक दृष्टींनी आगळावेगळा आहे. या महोत्सवात पुस्तकांचे जवळपास २५० स्टॉल्स आहेत आणि १५ भाषांतील प्रकाशित पुस्तके या ठिकाणी वाचकांची आतुरतेने वाट पाहत आहेत. धार्मिक पुस्तकांपासून तर वैज्ञानिक माहिती देणाऱ्या पुस्तकांपर्यंत आणि बालवाचकांपासून महाविद्यालयीन आणि स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त अशी विविध पुस्तके या ठिकाणी उपलब्ध आहेत. या ठिकाणी सुमारे दोन लाख पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध आहेत. या, बघा, खरेदी करा आणि वाचा असं आवाहन जणू ते करीत आहेत. अशा प्रकारचे पुस्तक प्रदर्शन दिल्लीत दरवर्षी होणाऱ्या पुस्तक मेळ्यानंतर महाराष्ट्रात प्रथमच होते आहे. या पुस्तक महोत्सवाला वाचकांचा अतिशय उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. आबालवृद्ध या महोत्सवाला भेट देत आहेत. या महोत्सवामुळे अनेक लेखक, कवींची पुस्तके पाहण्याची, वाचण्याची आणि खरेदी करण्याची संधी वाचकांना मिळते आहे. वैचारिक दृष्ट्या समृद्ध व्हायचे असेल तर येथे येऊन ' वाचावी बहुतांची अंतरे ' असेच म्हणावे लागेल.






# आनंदी पहाट

## व्यवसायात पैशाची मोजदाद करण्याचे तंत्र

आधुनिक केसरी

पैशाच्या मोजमाप संकल्पनेतील महत्त्वाचा दोष असा आहे, की अनेक घटकांमुळे आर्थिक परिणाम किंवा व्यवसायाच्या आर्थिक स्थितीत दीर्घकालीन बदल होऊ शकतात; परंतु संकल्पना त्यांना आर्थिक स्टेटमेन्टमध्ये सांगण्याची परवानगी देत नाही. फक्त अपवाद हा समर्पक बाबींची चर्चा असेल ज्यात व्यवस्थापनाने आर्थिक विवरणांसह प्रकटीकरण समाविष्ट केले आहे. अशाप्रकारे, हे पूर्णपणे शक्य आहे, की व्यवसायाचे मुख्य अंतर्निहित फायदे उघड केले जात नाहीत, जे नफा निर्माण करण्याच्या व्यवसायाच्या दीर्घकालीन क्षमतेचे प्रतिनिधित्व करतात. सामान्यतः उलट परिस्थिती नसते, कारण व्यवस्थापनाला लेखा मानकांद्वारे वित्तीय स्टेटमेंट्ससह असलेल्या नोट्समध्ये सर्व वर्तमान किंवा संभाव्य दायित्वे उघड करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. थोडक्यात, पैशाच्या मोजमाप संकल्पनेमुळे आर्थिक स्टेटमेंट्स जारी होऊ शकतात; जे व्यवसायाच्या भविष्यातील वरच्या बाजूचे पुरेसे प्रतिनिधित्व करू शकत नाहीत. तथापि, जर ही संकल्पना अस्तित्वात नसती, तर व्यवस्थापक कमी समर्थनीय आधार असलेल्या आर्थिक विवरणांमध्ये स्पष्टपणे अमूर्त मालमत्ता जोडू शकले असते. अर्थ मापन संकल्पना सांगते, की व्यवसायाने केवळ लेखा व्यवहाराची नोंद केली पाहिजे. कारण ती पैशाच्या संदर्भात व्यक्त केली जाऊ शकते. याचा अर्थ असा, की लेखा व्यवहाराचा फोकस गुणात्मक माहितीवर न ठेवता परिमाणात्मक माहितीवर असतो. अशा प्रकारे, मोठ्या संख्येने कंपनीच्या लेखा नोंदींमध्ये कधीही प्रतिबिंबित होत नाहीत. याचा अर्थ असा होतो, की ते कधीही त्याच्या आर्थिक विवरणांमध्ये दिसत नाहीत. सर्व घटक व्यवसायाच्या आर्थिक परिणामांमध्ये अप्रत्यक्षपणे परावर्तित होतात, कारण त्यांचा महसूल, खर्च, मालमत्ता किंवा दायित्वांवर परिणाम होतो. उदाहरणार्थ, उच्च स्तरीय ग्राहक समर्थनामुळे ग्राहकांची धारणा वाढेल आणि कंपनीकडून पुन्हा खरेदी करण्याची प्रवृत्ती वाढेल, ज्यामुळे उत्पन्नावर परिणाम होतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## जाण मतितार्थ | जन्माचा ह्या ||

संसाराचे ओझे | मानू नये जड ||
सत्कर्माची जोड | असु द्यावी ||१||
उत्पन्नाचा मेळ | खर्चाशी घालावा ||
शिल्लक राखावा | मान जगी ||२||
गरजांची सिमा | ओळखली ज्याने ||
व्यवहार त्याने | सिध्द केला ||३||
सात्विक बुध्दीने | वागता जनात ||
तोच जगतात | सुखी होतो ||४||
हरिनाम जोडी | संसार परमार्थ ||
जाण मतितार्थ | जन्माचा ह्या ||५||



# निरुपण


आधुनिक केसरी

तंव तें अत्यंत पीडावलीं ।वाट पाहात बैसलीं ।
म्हणती दिवसगती कां लागली ।काये कारणें देवा ॥१८॥
आतां आम्ही काये खावें ।किती उपवासीं मरावें ।
ऐसियाचे संगतीस देवें ।कां पां घातलें आम्हांसी ॥१९॥
ऐसें आपुलें सुख पाहाती ।परी त्याचें दुःख नेणती ।
आणी शक्ती गेलियां अंतीं ।कोणीच कामा न येती ॥२०॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मन आशा जबले रहे, तब लगि बुद्धि मलीन । वास्तव रुप दरशै नहीं, ज्यों मुख दर्पण लीन ।।१४०।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/१४०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : जोपर्यंत मनात संसाराची (जगाची) आशा लागून राहाते तोपर्यंत बुद्धि मलिन असते. आत्म्याला आपलं शुद्ध चैतन्यमय रूप दिसू शकत नाही, जसं मलिन आरशात आपण स्वतःचं मुख पाहू शकत नाही. म्हणून साधकांसाठी हे आवश्यक आहे की, संसारापासून आपला रोख वळवून प्रभूप्राप्ती साठी आपली सर्व शक्ती लावली पाहिजे. कारण प्रभूप्राप्तीतच सर्व प्राप्ती आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# काव्य-चरितावली

पुष्प ५८वे

आधुनिक केसरी

म्हणती महाराज यात्रेकरूंना । ऐका हो माझ्या बोलण्या । उभा मी विनंती करण्या । या माझ्या भावासाठी ।। १ ।।
विश्वेश्वराने वर दिला आम्हाला । तोच सांगतो तुम्हाला । गंगा स्नानाने जो शुद्ध झाला ।त्याने द्यावे आलिंगन या महारोगी भावाला ।। २ ।। पण माझे पूर्ण ऐकून घ्यावे । मग कुणी पुढे यावे । त्याने लक्षात असू द्यावे । आलिंगन दिल्यावर हा रोग होईल त्याला ।। ३ ।।
जर पुन्हा त्याने स्नान केले । होईल एक भले । मन त्याचे आधीच शुद्ध झालेले । मग होईल नाहीसा रोग त्याचा ।।४।।
लोक पुढे झालेले । तसेच मागे सरले । क्षणात पसार झाले। त्या घाटा वरूनी ।। ५ ।। एक तरुण पुढे झाला । महाराजांना बोलला । अर्थ समजून घेतला । दिले त्याने आलिंगन शांताश्रम स्वामींना ।।६ ।।
श्री महाराज त्यास म्हणाले । काशी यात्रेचे खरे फळ तुज मिळाले । रामरायाने कल्याण केले । समज तू ।। ७ ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# अनुसंधानात राहिल्यावर अभिमान गळून जातो

आधुनिक केसरी

अभिमान सोडून जो गृहस्थाश्रम पाळील तोच खरा परमार्थी. अभिमान सोडल्याने गृहस्थाश्रम चांगला होतो. ' मी म्हणेन तसे होईल, ' असे कधीही म्हणू नये. अभिमानाच्या पायावर उभारलेली इमारत डळमळीत होणारच. अभिमान हा देहाचा आणि तत्संबंधी विषयांचा असतो. अभिमानाचे मूळच काढून टाकावे; म्हणजे, मी देहाचा आहे म्हणतो, हेच काढून टाकावे. हा देह माझा नाही हे आपल्याला पटते, पण अखंड सहवासाने आपले त्यावर प्रेम जडते. एकदा देहावर प्रेम जडले म्हणजे मग अभिमान आला. त्याच्या पाठोपाठ लोभ, क्रोध येणारच. अभिमान म्हणजे ' मी कर्ता ' ही भावना असणे. ही भावना टाकून काम केले, तर व्यवहारात कुठे नडते ? आपल्या देहाचा आणि मनाचा फार निकटचा संबंध आहे. पण देह केव्हातरी जाणार असल्याने त्याला इतके महत्त्व नाही. नुसता जाडजूड देह कामाचा नाही. आपले मन तयार झाले पाहिजे. ' मी भगवंताचा आहे ' हे एकदा मनाने जाणून घेतले, म्हणजे मग अभिमानरहित होता येते. नेहमी भगवद्भजनात राहण्याचा



प्रयत्न करा, म्हणजे अभिमान शिवणार नाही. डोळ्यांत पाणी आणून भगवंताला आळवावे, त्याला शरण जावे; भगवंत कृपा केल्याशिवाय राहणार नाही. आपण आपल्या मर्यादा ओळखून वागावे. अमुक एक गोष्ट अमक्या तऱ्हेने घडावी असे जोपर्यंत आपल्याला वाटते आहे, तोपर्यंत व्यवहाराच्या मार्गाने जो योग्य प्रयत्न आहे तो आपण केला पाहिजे. पण प्रयत्न केल्यावर मात्र त्याचे फळ भगवंतावर सोपवावे, आणि जे काही घडेल त्यामधे समाधान मानावे. आपले अंतःकरण नेहमी शुद्ध ठेवावे. रात्री निजण्यासाठी अंथरुणावर पडले असताना आपले अंतरंग शोधून पाहावे की, ' मी कुणाचा द्वेष-मत्सर करतो का ? ' तसे असेल, तर ते मनातून जबरीने काढून टाकावे; ते थोडे जरी शिल्लक राहिले, तरी आपल्या परमार्थाच्या आड येणार आहे; आपल्या मनाने आपल्याला निश्चयाने असे सांगितले पाहिजे की, ' मी कुणाचाही द्वेष करीत नाही. ' आपले अंतःकरण इतके शुद्ध आणि सरळ असावे की, आपण तर कुणाचा द्वेष-मत्सर करू नयेच नये, परंतु दुसरा कुणी आपला द्वेष करीत असेल ही कल्पनासुद्धा आपल्याला येता कामा नये. ' मी भगवंताचा आहे, या देहाचा नाही, ' असे अखंड अनुसंधान ठेवून, आपल्याला भगवत्स्वरूप का होता येणार नाही ? जो आतबाहेर भगवंताने भरून राहील किंवा त्या ज्ञानाने भरून राहील तोच खरा ज्ञानी होय; आणि जाणीव ज्याप्रमाणे देहाला व्यापून असते, त्याप्रमाणे भगवंताचे स्मरण ज्याचे मन व्यापून टाकील तोच खरा साधक, तोच खरा अनुसंधानी, आणि तोच खरा मुक्त समजावा.
२७२. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामाची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे.

# जनार्दन स्वामी

आधुनिक केसरी

कोणत्याही धर्माचा पंथाचा भेद केला नाही. संपूर्ण भारततीर्थ यात्रा केली आपकाऱ्यावर उपकार केल.आश्रमात भाविकांसाठी ,विद्यार्थी,वारकरी ,साधू ,संत ,अनाथ यांच्यासाठी मोठीमोठ्या इमारती व वसतिगृह निर्माण केले व स्वतःसाध्या झोपडीत राहून जनता जनार्दनाची सेवा केली. सामुदायीक जप ,तप,अनुष्ठान ,यज्ञ ,पारायण , भजन आणि भोजन असा आग्रह असणाऱ्या स्वामीजींनी जनसामान्यांना अपार आनंदाचा आणि मौलिक मुल्यांचा सुलभतेणे लाभ करून दिला.



विकासातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व
स्व.विनायकराव पाटील

पान ६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, २८ डिसेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari




# वाशी शहराला हातभट्टीचा वेढा

## शहराच्या चौफेर खुलेआम हातभट्टीचे बॉयलर पेटले

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील वाशी हे तालुक्याचे ठिकाण या तालुक्याच्या गावात येणाऱ्या प्रत्येक प्रमुख मार्गावरच गावठी दारूचे दुकाने अगदी थाटामाटात उभी केलेली दिसून येत आहेत. पोलीस प्रशासनाने व संबंधित उत्पादन शुल्क विभागाने याबाबत डोळ्यात बंद पाकिटाचे अंजन घातले की काय?अशीच चर्चा ग्रामस्थांमधून होत आहे.

कारण वाशी शहरातील कळंब रोड, एस.आर पंपा समोर, तांदुळवाडी रोडवरील बाजार मैदानात, आणि देवस्थानाचे ठिकाण काशी विश्वनाथ मंदिरासमोर छुपा मार्गाने नाही तर राजरोसपणे मार्गाने हातभट्टी दारूची सर्रास विक्री होत आहे. तालुक्यात रोजंदारी करणाऱ्या कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. त्यात दिवसभर अंग मेहनतीचे अधिकचे काम केल्याने थकवा कमी करण्यासाठी म्हणुन हे कामगार दारूचा आधार घेतात. देशी व विदेशी दारूच्या किमती वाढविल्याने ती खिशाला न परवडणारी असल्याने, विविध प्रकारच्या घातक रसायनांचा वापर करून बनवलेली हातभट्टी दारू मद्यपी हा सर्व प्रकाराकडे दुर्लक्ष करून केवळ नशेसाठी हातभट्टीची दारू डोळे झाकून पित असल्याची माहिती या परिसरातील नागरिकांनी दिली. हातावर पोट असणारे अनेक लोक अंगमेहनतीची कामे जास्त प्रमाणावर करीत असल्याने बहुतेकांना दारूचे व्यसन जडले. हातभट्टी दारू सहज मिळू लागल्याने व केवळ १० ते २० रूपये ग्लास मिळत असल्याने ही दारू पिणाऱ्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढू लागले आहे. तालुक्यातील बेरोजगार युवापिढी ही व्यसनाच्या आहारी जात आहे. दारूमुळे परिसरातील शेकडो मद्यपींना वेगवेगळे आजार जडत आहेत.कुटुंबांमध्ये भांडणे वाढली. मुलाबाळांच्या शिक्षणावर खर्च होणारा पैसा वाममार्गाला जाऊ लागला. परिणामी, शेकडो कुटुंबातील महिला हैराण झाल्या आहेत.

कारण सर्रासपणे शहराच्या मुख्य मार्गावर तसेच शहरांमध्ये वर्दळीच्या ठिकाणी गावठी दारूचे अड्डे, बिनधास्त गुटखा विक्री, गांजा विक्री अशा ह्या बिंदासपणे होणाऱ्या अवैध धंदयावरून पोलीस प्रशासनाच्या कार्यशैली बाबत सर्वसामान्य नागरिकांमधून शंका व्यक्त केली जात आहे.

# नाशिक विभागस्तरीय प्रशिक्षणात सुलभकांसोबत 'सेल्फी विथ सक्सेस'

## पहिली ते आठवीच्या सर्व शिक्षकांसाठी प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** दररोज येणाऱ्या नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी सक्षम व्हावा या हेतूने विद्यार्थ्यांच्या स्वतः शिकण्याची व मूल्यमापनाची प्रक्रिया सातत्याने सुरू राहावी तसेच विद्यार्थ्यांनी स्वतः शिकायचे कसे? याबाबत पहिली ते आठवीच्या शिक्षकांसाठी अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. यासंदर्भात आयोजित नाशिक विभागस्तरीय प्रशिक्षणात राज्य समन्वयक निलेश घुगे यांनी सुलभकांसोबत 'सेल्फी विथ सक्सेस' घेऊन सुलभकांच्या कार्याचे कौतुक केले. नाशिक जिल्ह्यातील अंजनेरी ता. त्र्यंबकेश्वर येथील सपकाळ नॉलेज हब अंतर्गत आर्चिड इंटरनॅशनल स्कूलमध्ये पाच दिवस नाशिक विभागस्तरीय प्रशिक्षण वर्ग पार पडला. या प्रशिक्षणात जळगाव, धुळे, नंदुरबार व नाशिक जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून नऊ शिक्षक यांना प्रशिक्षण देण्यात आले. हेच नऊ शिक्षक सध्या तालुकास्तरावर पहिली ते आठवीच्या सर्व शिक्षकांना प्रशिक्षण देत आहेत. नाशिक येथील प्रशिक्षण वर्गदरम्यान प्रशिक्षणाचे राज्य समन्वयक निलेश घुगे यांनी प्रशिक्षण वर्गांना भेटी देऊन समाधान व्यक्त केले. तसेच प्रशिक्षणादरम्यान सुरू असलेल्या कामकाजाची माहिती घेऊन सुलभकांचे कौतुक केले. त्यावेळी सुलभकांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून त्यांच्यासोबत श्री. घुगे यांनी सेल्फी विथ सक्सेस या अनुषंगाने सेल्फी घेतली. यावेळी राज्य सुलभक डॉ. जगदीश पाटील, रामेश्वर भदाणे, ज्ञानेश्वर शिरसाट यांची उपस्थिती होती. विशेष म्हणजे या राज्य सुलभकांचे प्रथम प्रशिक्षण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे येथे पाच दिवस पार पडले होते. त्यावेळी राज्य समन्वयक निलेश घुगे संपूर्ण पाच दिवस राज्य सुलभकांसोबत कार्यरत होते.

> प्रशिक्षणात विविध विषयांचा समावेश – अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन हे प्रशिक्षण इयत्ता पहिली ते आठवीच्या शिक्षकांसाठी असून त्यात प्रशिक्षण संदर्भातील व्हिडिओ पाहून त्यावर चिंतन करून आपले विचार स्वाध्यायाच्या स्वरूपात लिहिणे हा प्रशिक्षणाचा मुख्य हेतू आहे . प्रशिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी वाचन साहित्य वाचणे, आव्हान पुस्तिका सोडवणे व अध्ययन प्रक्रिया घडवून आणणे, त्यात प्रशिक्षणार्थ्यांचा कृतियुक्त सहभाग करून घेणे याचाही सहभाग आहे .



# अंगणवाडी बंदमुळे विविध समस्यांसह चिमुकले पोषक आहारापासून वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरातील व राज्यभरात अंगणवाडी सेविकांनी/मदतनिसानी आपल्या विविध मागण्यांसाठी ४ डिसेंबर २०२३ पासून बेम दत बंद पुकारला आहे. आज बंदला २२ दिवस पूर्ण होत आहेत तरीही मागण्यांबाबत शासनाकडून निर्णय घेण्यात येत नाही. शासस्तरावरून याबाबत उदासीनता दिसून येत आहे.त्यामुळे अंगणवाडी सेविकांनी देखील मागण्या मान्य होईपर्यंत बंद सुरू ठेवण्याचा पवित्रा घेतल्यामुळे अंगणवाडीत येणारे चिमुकले मात्र पोषण आहारापासून वंचितच राहीले आहेत. शासनामार्फत तालुक्यात सोयगाव व सावळदबारा विभागांतर्गत सर्वच अंगणवाड्या चालविल्या जातात. अंगणवाडीमध्ये येणारी मुले ही आर्थिक दुर्बल घटकातील, बिगारी काम करणारे, हातावरचे पोट असणा र्या शेतमजूर कुटुंबांतील आहेत. शासनाकडून येणारा पोषण आहार मुलांपर्यंत योग्य प्रकारे पोहोचविण्यात अंगणवाडी सेविकांची भूमिका महत्त्वाची असते. सध्या बंदमुळे किशोरी मुली, गरोदर स्त्रिया, लहान मुलांचा पोषण आहार बंद आहे. अंगणवाडी कर्मचारी या तुटपुंज्या मानधनावर संसाराचा गाडा गेल्या अनेक वर्षांपासून या सेविका आणि मदतनीस मानधन वाढीसाठी संघर्ष करत आहेत. सरकारी कर्मचा-यांचा दर्जा देण्याची त्यांची प्रम ख मागणी आहे. यामध्ये बहुतांश अंगणवाडी सेविका आणि मदतनीस या विधवा आणि परित्यक्ता आहेत. त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावरच असते, महागाई आकाशाला भिडली आहे आणि तुटपुंज्या पगारावर संसाराचा गाडा त्यांना हाकावा लागतो, बिन पगारी फुल्ल अधिकारी अशी आवस्था यांची झाली असून यांना पगार बाढ होणे गरजेचे असल्याचे सर्वच स्तरातून बोलले जात आहे. तर कार्यालयाकडे तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी त्यांना सतत वाहतूक खर्चही त्यांना स्वतःच करावा लागतो. त्यांना मिळणारे मानधन अत्यल्प आहे. तर कार्यकत्यांना २६ हजार रुपये आणि मदतनीस यांना १८ हजार रुपये मानधन वाढ करावी म्हणून बेमुदत बंद पुकारला आहे आणि वाढ झाल्याशिवाय माधार घेतली जाणार नसल्याचे समजते. मंत्री, आमदार, खासदार यांचे भत्ते, मानधन, सेवानिवृती बेतन कोणतेही आंदोलन न करता वाढ करण्यात आली आहे पण संसार चालविण्यासाठी अंगणवाडी कर्मचारी यांना मोठी कसरत करावी लागत आहे यामुळे मानधन आणि सेवानिवृत्ती वेतन मिळणे आवश्यक आहे.

# आंतरजातीय विवाह करणाऱ्यां जोडप्यांना सुरक्षागृहाचे संरक्षण

## जातपंचायत मूठमाती अभियानाकडून निर्णयाचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

किरणकुमार आवारे

निफाड :- ऑनर किलिंग सारखे गुन्हे रोखण्यासाठी सरकार आता पोलीस बंदोबस्त असलेले सुरक्षागृह उभारणार आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जोडप्यांना एक वर्षांपर्यंत नाममात्र शुल्क घेऊन निवासा सोबत सुरक्षागृह पुरवले जाणार आहे. गृह मंत्रालयाने याबाबत परिपत्रक काढले असून जातपंचायत मुठमाती अभियानचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी प्रसिद्धी पत्रक काढून या निर्णयाचे स्वागत केले आहे.

देशात विशेषतः हरियाणा व उत्तर प्रदेशातील सगोत्र विवाह केल्याने ऑनर किलिंग सारख्या घटना मोठ्या प्रमाणात समोर आल्या आहेत. भारतीय राज्य घटनेने व्यक्तीला दिलेल्या जीवितेच्या, स्वातंत्र्याच्या आणि समानतेच्या मुलभूत आधिकारावरच हा घाला असल्याने अशा प्रकारच्या गुन्ह्यांना पायबंद घालण्यासाठी शक्ती वाहिनीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना सदर आदेश दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यात यापुढे आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा पुरविण्याच्या अनुषंगाने प्रत्येक जिल्ह्यात पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. त्यात जिल्हा समाजकल्याण आधिकारी यांचा सदस्य म्हणून तर जिल्हा महिला बालकल्याण आधिकारी यांचा सदस्य सचिव म्हणून समावेश असेल. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहा संदर्भात प्राप्त तक्रारींची दखल घेऊन हा कक्ष तत्काळ कार्यवाही करेल असे गृह विभागाच्या आदेशात म्हटले आहे. पोलीसांच्या विशेष कक्षा मार्फत केल्या जाणाऱ्या कारवाईचा तसेच न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीचा त्रैमासिक आढावा घेण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अक्षध्येखाली समिती असणार आहे.

> **सर्वोच्च न्यायालयाचा आदेश काय?** सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना धमकी आल्यास व तशी तक्रार प्राप्त झाल्यास अप्पर पोलीस अधिक्षक दर्जाच्या आधिकाऱ्याने एका आठवड्याच्या आत तपास करुन अहवाल सादर करायचा आहे . पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याने तक्रार दाखल करून पुढील कार्यवाही करायची आहे . अशा जोडप्यांना संरक्षण द्यायचे आहे . विवाह इच्छुकांना आवश्यक सहाय्य करावे असे न्यायालयाच्या आदेशात म्हटले आहे .
>
> हरियाणातील खाप पंचायतीचा अभ्यास करण्यासाठी आम्ही हरियाणात गेलो होतो . ऑनर किलींग वर उपाययोजना म्हणुन तिथे सुरक्षागृह बांधण्यात आले आहे . त्याच धर्तीवर महाराष्ट्रात असे सुरक्षागृह उभारण्यात यावेत अशी मागणी जातपंचायत मुठमाती अभियानाने वेळोवेळी राज्य सरकारकडे केली होती . सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अशी उपाययोजना होत असल्याने ऑनर किलींगच्या घटना रोखता येतील .
> **– कृष्णा चांदगुडे, राज्य कार्यवाह, जातपंचायत मूठमाती अभियान**



# मोदी सरकारचा दणका

आधुनिक केसरी

भारतात फ्रॉड लोन ॲप्सचं (कर्ज देण्याच्या नावाखाली लोकांची फसवणूक करणारे ॲप्स) जाळं पसरू लागलं आहे. देशभरात लोन ॲप्सच्या माध्यमातून दररोज शेकडो लोकांची फसवणूक केली जात आहे. या माध्यमातून लोकांचा मानसिक छळ झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. अशा घटनांची वाढती संख्या लक्षात घेता केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. देशभरात सक्रीय असलेल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सना (समाज माध्यमांना) इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालयाने कठोर आदेश दिले आहेत. आयटी मंत्रालयाने मंगळवारी सर्व कंपन्यांना त्यांच्या प्लॅटफॉर्मवर कोणत्याही फ्रॉड लोन ॲप्सची जाहिरात दाखवू नका असे आदेश दिले आहेत. एखाद्या ठिकाणी घोटाळा झाला, फसवणुकीचं प्रकरण समोर आलं तर संबंधित फ्रॉड ॲपसह त्या ॲपची जाहिरात प्रसिद्ध करणारा सोशल मीडिया प्लॅटफॉर्महही जबाबदार असेल, असं आयटी मंत्रालयाने म्हटलं आहे. पुढच्या सात दिवसांच्या आत यासंबंधीची कार्यवाही करा, असे आदेश माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने मेटा कंपनीच्या फेसबूक, इन्स्टाग्राम आणि गुगलसारख्या ऑनलाईन प्लॅटफॉर्म्सना दिले आहेत. माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, सर्व प्रकारच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून अशा प्रकारच्या जाहिराती हटवण्यासाठी सरकार माहिती तंत्रज्ञान (आयटी) नियमांमध्ये सुधारणा करण्यावर काम करत आहे. त्यानंतर या कंपन्या कायद्याच्या कचाट्यातून सुटू शकणार नाहीत. दरम्यान, केंद्र सरकारने या जाहिरातींसंदर्भात काही मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. मध्यस्थ किंवा या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सने कर्ज आणि सट्टेबाजीशी (लोन आणि बेटिंग) संबंधित कोणत्याही जाहिरातींना परवानगी देऊ नये. या जाहिरातींच्या माध्यमातून नागरिकांची, सोशल मीडिया वापरकर्त्यांची फसवणूक केली जाते. त्यामुळे अशी प्रकरणं समोर आली तर त्यास हे मध्यस्थ, जाहिरातदार आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स जबाबदार असतील.

# स्त्रियांचा सन्मान आणि स्त्रियांचे रक्षण

आधुनिक केसरी

**महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार चौथे महिला धोरण राबवत असून राज्य मंत्रिमंडळानेही यास मान्यता दिली आहे. राज्यात नाव लिहिताना स्वतःचे नाव नंतर वडिलांचे नाव आणि शेवटी आडनाव लिहिण्याची प्रथा यामुळे मोडिस निघणार असून नवीन धोरणानुसार यापुढे आता वडिलांच्या नावाआधी आईचे नाव लिहिणे बंधनकारक असणार आहे. मागील काही वर्षांपासून संपूर्ण नाव लिहिताना आपल्या नावानंतर वडिलांचे नाव लिहिण्याआधी आईचे नाव लिहिण्याची पद्धत तरुणांमध्ये रूढ होऊ लागली आहे.**



खासकरून सामाजिक माध्यमांवर हा ट्रेंड पाहायला मिळत आहे. काहीजण तर नावापुढे वडिलांचे नाव न लावता केवळ आईचेच नाव लिहू लागले आहेत. नव्याने मंत्रिमंडळात सहभागी झालेल्या काही युवा मंत्र्यांमध्येही या ट्रेंडचा परिणाम दिसून आला. राज्यातील काही मंत्र्यांनी शपथ घेताना आपल्या नावापुढे आपल्या आईचेही नाव जोडले. या ट्रेन्डला आता राज्य सरकारने अधिकृत करण्याचा निर्णय घेतला असून यामुळे स्त्रियांचा सन्मान राखला जाणार असल्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांनी बारामती येथे बोलताना स्पष्ट केले आहे. स्त्रियांच्या सन्मानार्थ राज्य सरकारने घेतलेला निर्णय कौतुकास्पद असून यामुळे व्यक्तीच्या जडण घडणीमध्ये सिंहाचा वाटा उचलणाऱ्या 'आई' चा सन्मान होणार आहे.

राज्य सरकारने स्त्रियांच्या सन्मानार्थ घेतलेला निर्णय कौतुकास्पद असला, तरी यामुळे पुढे अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात ते सोडवण्याची सिद्धताही करणे सरकारला क्रमप्राप्त ठरणार आहे. अनेक ऑफलाईन आणि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण नाव लिहिण्यासाठी आतापर्यंत तीनच ओळी दिल्या जात होत्या आता त्यासाठी चार ओळी द्याव्या लागणार असल्याने ऑफलाईन अर्जाची नव्याने छपाई तर ऑनलाईन अर्जामध्ये आवश्यक तो बदल करावा लागणार आहे. हा बदल केवळ राज्याच्या सीमेपुरता सीमित असेल, तर लोकांकडे सध्या असलेल्या सरकारी ओळखपत्रांमध्ये उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड, रेशन कार्ड, पासपोर्ट यांमध्ये बदल करायचा का ? असाही प्रश्न लोकांना पडू शकतो. अविवाहित मुलींसाठी वरील नियम लागू होईलच मात्र विवाहित स्त्रियांनी आपल्या नावापुढे पतीच्या नावाआधी आईचे नाव लावायचे की नाही ? असे अनेक प्रश्न यानिमीत्ताने निर्माण होऊ शकतात. अर्थात राज्य सरकारने या नवीन धोरणाला सध्या केवळ मान्यता दिली असून हे धोरण प्रत्यक्ष अमलात आणण्याआधी सर्व प्रश्नांची उकल होईलच अशी अपेक्षा करायला सध्यातरी हरकत नाही. गेल्या काही वर्षांपासून सरकारी कामांसाठी भराव्या लागणाऱ्या विनंती अर्जामध्ये आईच्या नावाचा रकाना वाढवण्यात आला आहे हीसुद्धा कौतुकाची बाब आहे.

स्त्रियांचा सन्मान करण्याची शिकवण हिंदू धर्माचा गाभा असून प्राचीन काळातील धर्मग्रंथांतून, कथांतून त्याची प्रचिती आपण घेतलेली आहे. हिंदू धर्मशास्त्राने स्त्रीला शक्तिरूप मानले आहे. कोणतेही कार्य असो वा संकल्प, त्यासाठी शक्ती अनिवार्य आहे. शक्तीविना कोणताही जीव अथवा वस्तू निर्जीव स्वरूप असते. शक्तीचा सन्मान करणारी या देशात ५१ शक्तिपीठे आहेत , त्यांतील साडेतीन शक्तिपीठे आपल्या महाराष्ट्रात आहेत. सज्जनांच्या रक्षणार्थ आणि दुष्टांच्या संहारार्थ शक्तीने आपले मारक रूप वेळोवेळी प्रकट करून असुरी शक्तीचा विनाश केल्याचे आपण धार्मिक कथांतून, मालिकांतून वाचले आणि पाहिले आहे. ज्या दुष्ट शक्तींपुढे देवताही हतबल झाल्या अशांचा नाश देवींनी आपल्या अगाध सामर्थ्याने केला आहे. म्हणूनच आपल्याकडे शक्तीचे नाव देवांच्या नावाआधी जोडण्याची परंपरा फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. 'राधाकृष्ण', 'लक्ष्मीकेशव', 'सीताराम', 'लक्ष्मीनारायण', ही त्याचीच काही उदाहरणे आहेत. एका स्त्रीच्या( माता सीतेच्या ) सुटकेसाठी रामायण घडले, भर सभेत झालेल्या स्त्रीच्या( द्रौपदीच्या ) अपमानाचा बदला घेण्यासाठी महाभारत घडले. भारतीय संस्कृतीत स्त्रीच्या सन्मानाचे काय महत्व आहे हे दर्शवण्यासाठी केवळ ही दोनच उदाहरणे पुरेशी आहेत.

स्त्रियांच्या सन्मानार्थ राज्य सरकारने घेतलेला निर्णय कौतुकास्पद असला, तरी आजमितीला स्त्रियांच्या संरक्षणाचा प्रश्न अधिक महत्वाचा आहे असे वाटते. राज्यातील स्त्री अत्याचाराच्या वाढत्या घटना मनाला अस्वस्थ करणाऱ्या आहेत. पोलीस असो, शिक्षण असो वा वैद्यकीय क्षेत्र कोणतेच क्षेत्र आज महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नाही. ज्या क्षेत्रांवर महिला डोळे झाकून विश्वास ठेवत असत त्या क्षेत्रातही वासनांधांचा भरणा झाला आहे. मागच्याच आठवड्यात मुंबईत एका ६४ वर्षीय महिलेवर अत्याचार करण्यात आला याआधी ८० वर्षाच्या वृद्धेवरही मुंबईतच अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. त्यामुळे स्त्री मग ती कोणत्याही वयाची असो, आज सुरक्षित राहिलेली नाही. चरितार्थ चालवण्यासाठी नोकरीनिमित्त घराबाहेर पडणारी स्त्री खासगी कंपन्यांतील लैगिक शोषणाला बळी पडू लागली आहे. नात्यातील मंडळींकडून केल्या जाणाऱ्या शोषणाचे प्रमाणही वाढू लागले आहे. स्त्रीच्या निर्बलतेचा फायदा घेऊन संधी साधण्यासाठी टपून बसलेल्या गिधाडांची संख्या समाजात वाढू लागली आहे. स्त्री अत्याचारविरोधी कायदे अधिक कठोर करूनही स्त्री अत्याचारांच्या घटनांध्ये तिळमात्र घट झालेली नाही, त्यामुळे आता अबलांना सबला करण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे. शाळा मग ती सरकारी असो वा खासगी, प्रत्येक शाळांमध्ये मुलींसाठी स्वरक्षण प्रशिक्षणाचे नियमितपणे धडे दिले जावेत. येणाऱ्या प्रतिकूल प्रसंगाला कसे सामोरे जावे आणि त्याचा प्रतिकार कसा करावा याचे अद्यावत ज्ञान प्रत्येक मुलीला शालेय जीवनापासूनच दिले जावे. जेणेकरून आज नाहीतर येणाऱ्या काही वर्षांत याचे सकारात्मक परिणाम आपल्याला नक्कीच दिसतील. आज बऱ्याच ठिकाणी लाठी काठी, ज्युडो कराटे यांचे अद्यावत प्रशिक्षण देणारे खासगी वर्ग भरवके जातात, काही सामाजिक संघटना अशाप्रकारचे वर्ग विनामूल्यही चालवतात; मात्र सध्याचा शालेय अभ्य्साक्रम पाहता शाळा, ट्युशन्स,गृहपाठ आणि घरकामात आईला मदत करणें यांमध्ये गुंतून गेलेल्या मुली या वर्गांना उपस्थित राहू शकत नाहीत. यासाठी शालेय अभ्यासक्रमांच्या वेळेतच केवळ मुलींसाठी किमान अर्धा तास तरी शारीरिक तंदुरुस्तीसह स्वरक्षण प्रशिक्षणाचे शिक्षण देण्यात यावे. राज्य सरकने यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता असून अशा वर्गांत तयार होणाऱ्या मुली भविष्यात समाजातील वाढत्या स्त्री अत्याचारावर नक्कीच अंकुश आणू शकतात. आज आपण राजमाता जिजामाता, झाशीची राणी लक्ष्मीबाई, राणी चेन्नमा यांच्या पराक्रमांच्या कथा इतिहासात अभ्यासतो, त्यांची उदाहरणे देतो; मात्र या सर्वांनी घेतलेल्या प्रगत प्रशिक्षणामुळेच त्या प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊ शकल्या हे लक्षात घ्यायला हवे. आज पुन्हा गरज निर्माण झाली आहे स्त्रियांना सबल आणि सामर्थ्यवान करण्याची.

जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई, ९६६४५५९७८०



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# उद्रेक प्रकट होणं म्हणजे राग येणं

आधुनिक केसरी

**राग येत नाही असा कोणीही व्यक्ती या सृष्टीवर अस्तित्व नाही.रागाच प्रमाण कमी जास्त असू शकत त्याच बरोबर तो आल्या नंतर त्याचा प्रभाव किती प्रमाणात निर्माण होणार याच देखिल मूल्य वेगवेगळ असत.जागृत विवेक आणि ज्ञान अवस्था मजबूत असेल तर राग आपलं फार काही उल्लेखनीय नुकसान करू शकत नाही. पण राग आल्यावर अज्ञान अवस्था आणि अंहकर वृद्धिंगत झाला तर मग याच रूपांतर वादळात होऊन प्रचंड नुकसान होत. खंरच राग अचानक येतो का ? तर नक्कीच नाही राग हा अचानक येत नाही अनेक दिवसांपासून मनात साठलेला तणाव प्रकट होण म्हणजेच राग येणं होय. राग हा क्षणांत येत असला तरी त्याची पार्श्वभूमी मोठी असते.**

अनेक दिवसांपासून साठलेला तणाव एकाएकी प्रकट होतो.आणि मग आपल्याला प्रचंड राग येतो. दैनंदिन जीवनात तणावाचे व्यवस्थपान करण्यामध्ये आपण यशस्वी झालो तर मनात रगाचा संचय निर्माण होऊ शकत नाही.हे वास्तविक सत्य आहे. आपल्याला अधुन मधुन प्रचंड अनावर होणारा राग येत असतो.तो येण स्वभाविक आहे आणि हा प्रचंड राग एकाएकी येत नाही तर तो अनेक दिवसांपासून आपल्या मनात एक प्रकारचा तणाव वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने जो संचय निर्माण झालेला असतो त्याच रूपांतर रागात होत असत.वास्तविक जीवन म्हटलं कि सुख दुःख हे समीकरण आलंच. व्यक्ती कोणीही असला तरी जीवनातील सुख दुःख यापासून सुटका हि कोणालाही शक्य नाही तरी सुद्धा दैनंदिन अनेक विषयांच्या अनुषंगाने आपल्या मनात सकारात्मक आणि नकारात्मक विचार निर्माण होता असतात.वारंवार निर्माण होणारे नकारात्मक विचार हे तणावात रूपांतर करत असतात.आणि हाळुहळु निर्माण होणाऱ्या या तणावाचे शेवटी प्रचंड रागात रूपांतर होते.म्हणजे राग हा कुठल्याही प्रकारचा असो एका क्षणात निर्माण होत नाही तो निर्माण होत असताना तो एक एक टप्प्याने होत असतो.याच वेळी आपण नेमकं दुर्लक्ष करतो.आणि यावेळी जर आपण हि परस्थिती ओळखु शकलो तर मग मात्र आपण प्रचंड अशा येणाऱ्या रागा पासुन स्वतः ला वाचवु शकतो. यासाठी दैनंदिन नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. आहार,दैनंदिन व्यवस्थित संवाद,वाचन,अध्यात्मिक वाचन खुप महत्वपूर्ण आहे. तेव्हाच दैनंदिन अगदी तणाव मुक्त राहु शकतो.आणि पर्यायाने तणाण मुक्त रहीलो तर आपली सुटका प्रचंड अशा येणाऱ्या रागापासुन होऊ शकते.म्हणजे जीवनात येणारा प्रचंड राग आणि त्यामुळे होणार आपलं प्रचंड नुकसान थांबु शकत.व त्याचे आपल्या जीवनावरील विपरीत परिणामही आपण कुठं तरी नियंत्रित करू शकतो.म्हणून तणाव मुक्ति हि खूप आवश्यक आहे.आणि आपण ती नक्कीच करू शकतो. त्यासाठी आपण कितीही व्यस्तता असली तरी देखील दिवसभरात शरिरासाठी साधारणतः एका तसाचा वेळ आपण दिला पाहिजे. जेणेकरून निर्माण झालेला थोडा तणाव त्याच दिवशी संपुष्टात येईल.तसेच संवाद म्हणजे एक आठवड्याच्या दरम्यान आपल्यला मानसिक स्थैर्य मिळेल मन शांत होईल. असा संवाद झालाच पाहिजे. संवाद हे तणाव मुक्ति चे अगदी सुयोग्य साधन आहे.आपण ज्या व्यक्तिशी संवाद साधल्या नंतर मनाला हलकं वाटलं मन शांती मिळत असेल तर अशा व्यक्ती सोबत अंहकार बाजुला ठेवून आवश्यकतेनुसार वैचारिक संवाद साधला पाहिजे. असे शब्द आपल्या कानावर पडताच क्षणी आपण तणावमुक्त झाल्यासारखे आपल्यला वाटत असतं. आणि त्यामुळे निर्माण होणारा तणाव त्याचे रागात होणार रुपांतर जगीच संपुष्टात येत असतं. दैनंदिन जीवनात वाचन मग ते काही पण वाचा पण ते आवश्यक आहे आणि त्यामध्ये हि अध्यात्मिक वाचन केले तर उत्तम आहे.आणि या पद्धतीने आपण आपल्या जीवनात निर्माण होणारा शारिरिक मानसिक तणाव कमी करू शकतो आणि पर्यायाने त्याचे रागात होणार रुपांतर आपण नक्कीच थांबवु शकतो.आणि एक ज्ञान पुर्ण शांत स्थिर जीवन आपण जगु शकतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# गुरु गोविंदसिंह यांच्या पुत्रांचे बलिदान युवकांसाठी प्रेरणादायी

## हंसराज अहीर : खालसा कॉन्व्हेंटमध्ये 'वीर बाल दिनी' वीरपुत्रांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** खालसा पंथाचे दहावे गुरु गोविंदसिंहजी यांची अल्पवयीन मुलांच्या शहादतीच्या स्मरणार्थ आज संपुर्ण देश वीर बाल दिवस साजरा करुन त्यांच्या पंथ व देशाभिमानास अभिवादन करीत आहे. साहबजादे बाबा जोरावर सिंह जी व बाबा फतेह सिंह जी यांची शौर्याची शहीद गाथा वर्तमान व भावी पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील असे विचार राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी व्यक्त केले.

दि. 26 डिसेंबर रोजी श्री गुरुद्वारा गुरु सिंह सभाव्दारा खालसा कॉन्व्हेंट येथे आयोजित 'वीर बाल दिवस' निमित्त आयोजित कार्यक्रमास गुरुव्दारा गुरुसिंह सभेचे अध्यक्ष चमकोरसिंह लाठी बसरा, बंटी भाटीया, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, प्राचार्य सिमरन कौर, माजी नगरसेवक राजेंद्र अडपेवार, विनोद शेरकी, सरवनसिंह (पंगू) सलुजा, पुनम तिवारी आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी हंसराज अहीर म्हणाले की, माननिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गतवर्षी 9 जानेवारी रोजी गुरु गोविंदसिंह यांच्या प्रकाश पर्व प्रसंगी वीरपुत्रांच्या स्मरणार्थ वीर बाल दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती.

देशात शासकीय व सामाजिक स्तरावरुन हा दिवस साजरा होत असून तो समस्त बालकांना प्रेरणा देणारा असल्याचे सांगत अहीर यांनी गुरु गोविंदसिंह जी यांच्या दोन्ही पुत्रांचे हौतात्म्य पंथ रक्षणार्थ असल्याने त्यांच्या या शौर्याच्या हौतात्म्याचे देशाला अनादीकाळ स्मरण होत राहील मुघलांनी ज्या क्रुरतेने या बालकांना भिंतीत दफन करीत त्यांचे आयुष्य संपविले त्यातून प्रेरणा घेत देशासाठी लढा देणारे अनेक शुरवीर योध्दे निपजतील असेही अहीर यांनी सांगितले तत्पूर्वी हंसराज अहीर यांनी गुरुव्दारात माथा टेकुन गुरुग्रंथ




साहीब ग्रंथाचे दर्शन घेतले. यावेळी या दोन्ही वीर बालकांच्या स्मृतीस अभिवादन केले. यावेळी अनेक मान्यवरांनी समयोचित विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास बहुसंख्य बालक-बालिका, शिक्षकवृंद व संस्थेचे सन्माननिय पदाधिकारी उपस्थित होते.




# ‘गो-ग्रीन’द्वारे वीजग्राहकांची २५ लाखांची वार्षिक बचत

## २० हजारांहून अधिक ग्राहकांचा छापील बिलांना 'टा-टा'

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेअंतर्गत वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'ई-मेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडणाऱ्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील पर्यावरणस्नेही २० हजार ४१२ ग्राहकांकडून २४ लाख ४९ हजार ४४० रुपयांची वार्षिक बचत सुरू आहे.

महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेनुसार वीजग्राहकांनी छापील वीजबिलाच्या कागदाऐवजी फक्त 'ई-मेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे योजनेत सहभागी ग्राहकांची वीजबिलांमध्ये वार्षिक १२० रुपयांची बचत होत आहे. वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संगणकीय प्रणालीद्वारे ते 'गो-ग्रीन'मधील ग्राहकांना 'ई-मेल'द्वारे पाठविण्यात येत आहे. सोबतच 'एसएमएस'द्वारे देखील वीजबिलाची माहिती देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांना ‘प्रॉम्प्ट पेमेंट’चा लाभ घेणे अधिक शक्य झाले आहे. गो-ग्रीन योजना ही काळाची गरज आहे. वीजग्राहकांनी या योजनेत सहभागी व्हावे व पर्यावरण रक्षणात योगदान द्यावे, असे आवाहन मुख्य अभियंता डॉ. मुरहरी केळे यांनी केले आहे.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलांतर्गत छत्रपती संभाजीनगर शहर मंडलात १० हजार ६२७ ग्राहक 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलात 'गो-ग्रीन'मध्ये ६ हजार ४०९ ग्राहक सहभागी आहेत. तसेच जालना मंडलातील ३ हजार ३७६ ग्राहकांनी 'गो-ग्रीन'मध्ये सहभाग घेतला आहे.

महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेचा पर्याय निवडण्यासाठी ग्राहकांनी वीजबिलावर छापलेल्या जीजीएन (GGN) या १५ अंकी क्रमांकाची नोंदणी महावितरणच्या मोबाईल ॲपद्वारे किंवा महावितरणच्या संकेतस्थळाच्या HTTPS://PRO.MAHADISCOM.IN/GO-GREEN/GOGREEN.JSP लिंकवर जाऊन करावी. याबाबतची अधिक माहिती WWW.MAHADISCOM.IN संकेतस्थळावर उपलब्ध आहे. 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी झालेल्या वीजग्राहकांना छापील वीजबिलांची गरज भासल्यास त्यांना ईमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येईल. सोबतच संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांची वीजबिले मूळ स्वरूपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

# नवीन खेळाडू तयार व्हावेत : शेळके

## लोणंदमध्ये भव्य क्रिकेट सामन्याचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** गेली अनेक वर्षे मी स्वतः व माझा मित्र परिवार क्रिकेट खेळ खेळत आहे. गेली अनेक वर्ष लोणंद मध्ये क्रिकेटचे सामने होत नव्हते. क्रिकेटचे सामने भरविले पाहिजेत.त्यामुळे दोन वर्षापूर्वी भव्य असे सामने सुरू करून या लोणंदमध्ये नवीन खेळाडू तयार व्हावेत. कारण महाराष्ट्र, देशभरच नव्हे तर परदेशात सुद्धा टेनिस बॉल वर सामने खेळविले जात असतात.जसे आयपीएल सुरू आहे. तसेच देशात सुद्धा टेनिस बॉलचं प्रिमियर लीग सुरू झालं आहे. टेनिस बॉल च्या खेळाला जागतिक दर्जा प्राप्त झालेला आहे. आपण गेली दोन वर्षे स्व. विनायकराव शेळके पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ टेनिस बॉल सामने घेतले जात आहे. यासाठी पहिल्या वर्षा पासून लोणंद नगरीचे हितचिंतक,मित्र परिवार, ग्रामस्थ पंचक्रोशीतील लोकांचे तसेच खेळाडूंचे चांगले सहकार्य मिळत आलेले आहे. लोकांनी मदत केल्या मुळे ही स्पर्धा मोठया प्रमाणात होत आहे.असे प्रतिपादन स्व.विनायकराव शेळके पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष व माजी नगरसेवक हणमंतराव शेळके पाटील यांनी केले.या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न करण्यात आला.यावेळी या आयोजना बद्दल आयोजक हणमंतराव शेळके पाटील यांनी भूमिका मांडली.या स्पर्धेचा उदघाटन कार्यक्रम नगराध्यक्षा सीमा वैभव खरात,उपनगराध्यक्ष रवींद्र क्षीरसागर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील शेळके,माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मणराव शेळके,माजी उपनगराध्यक्ष शिवाजीराव शेळके,माजी नगराध्यक्ष सचिन शेळके,प्रदिप क्षीरसागर, गणीभाई कच्छी,भिक्कुदादा कुर्णे,जाडकर बापू, एस आर धायगुडे,जे बी धायगुडे,डॉ.अनिलराजे निंबाळकर,नवनाथ शेळके,ओंकार कर्णवर, ॲड.गणेश शेळके,सागर गालिंदे,अनिल कुंभार, वैभव खरात,प्रमोद कुंभार,कुंडलिक मलगुंडे, तानाजीराव खताळ, जनार्दन क्षीसागर,रो हन धायगुडे, हरीश डोईफोडे, संदीप शेळके, भाऊसाहेब धायगुडे, किसन धायगुडे, सतिश भिसे, श्रीधर सोनवलकर, महेश शेळके, विकास धायगुडे,लखन बिचुकले,दिनेश कुंभार, बाळासाहेब शेळके,पोपटराव शेळके आदींसह खेळाडू उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचे स्वागत सन्मानचिन्हाने करण्यात आले. पहिल्या सामन्याचे नाणेफेक नगराध्यक्षा सीमा वैभव खरात यांच्या हस्ते करण्यात आले. निरा टायगर विरुद्ध भैरवनाथ क्रिकेट क्लब अंदोरी हा पहिला सामना मान्यवरांच्या समोर खेळविण्यात आला. युवा आणि होतकरू खेळाडूंना क्रिकेटमध्ये प्रोत्साहन देण्याकरिता हणमंतराव शेळके पाटील हे आयोजन करत आहेत.त्यामुळे प्रत्येक वर्षी विविध ठिकाणाहून आलेल्या संघांकडून नाव नोंदणी करून सहभाग घेतला जात आहे.खेळाडूंकडून सुद्धा मैदानावर चांगला खेळ साकारत प्रतिसाद दिला जात आहे. शिवाय क्रिकेट प्रेमींसाठी हे क्रिकेटचे सामने एक अनोखी पर्वणीच ठरत आहे.या सामन्याचे आयोजक असलेले हणमंतराव शेळके म्हणजे एक नावाजलेले व्यक्तिमत्त्व आहे.कारण क्रिकेट क्षेत्राबद्दल खूप ज्ञान त्यांना आहे.

क्रिकेट खेळामध्ये एक चांगलं काम केलेलं आहे.ते स्वतः एक चांगले खेळाडू असून अनेक नवोदित खेळाडूंना या सामन्याच्या माध्यमातून स्वतःची चमकदार कामगिरी करण्याची संधीच या आयोजनातून हणमंतराव शेळके पाटील यांनी मिळवून दिलेली आहे.या पंचक्रोशीतील खेळाडूंना या खेळामध्ये प्रोत्साहन मिळावे.म्हणून ही लोणंद शहरातील स्पर्धा नावाजलेली मानली जाते.

वेगवेगळ्या ठिकाणाहून संघ आणि त्यांचे प्रशिक्षक येत असतात.आपल्या कला गुणांना वाव देत असतात.नक्कीच असे सामने प्रेरणादायी असून या आयोजना बद्दल लोणंदसह पंचक्रोशीतून कौतुक केले जात आहे.ज्या क्रिकेटप्रेमींना प्रत्यक्ष हजेरी लावून सामने पाहता येत नाही.असे क्रिकेटप्रेमी यु ट्यूबच्या माध्यमातून हे सामने पाहण्याचा आनंद घेत आहेत.

# दिव्यांगांकरिता फिरत्या वाहनावरील दुकान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून हरीत उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल शॉप ऑन ई-व्हेईकल) उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी HTTPS://EVEHICLEFORM.MSHFDC.CO.IN/ या संकेतस्थळावर 4 जानेवारी 2024 सकाळी 10 वाजेपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे. या योजनेचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक व सामाजिक पुनर्वसन करून कुटूंबासमवेत जीवन जगण्यास सक्षम करणे असा आहे.

योजनेच्या अटी व शर्तीनुसार अर्जदार हा 18 ते 55 वयोगटातील महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असावा, दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान 40 टक्के असावे व तसे जिल्हा शल्य चिकित्सक अथवा सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केले असावे. अर्जदाराकडे दिव्यांगत्वाचे युडीआयडी प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. मतिमंद अर्जदाराच्या बाबतीत त्यांचे कायदेशीर पालक अर्ज करण्यास सक्षम असतील. दिव्यांग अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रुपये 2 लाख 50 हजार पेक्षा अधिक नसावे. लाभार्थी निवड करतांना जास्त दिव्यांगत्व असलेल्यास प्रथम प्राधान्य दिले जाईल. अतितीव्र दिव्यांगत्व असणाऱ्या दिव्यांग व्यक्तीस वाहन चालविण्याचा परवाना नाकारला असल्यास अशा परिस्थितीत देखील परवानाधारक नसलेल्या अतितीव्र दिव्यांग व्यक्तीच्या बाबतीत सोबत्याच्या सहाय्याने फिरत्या वाहनावरील व्यवसाय करण्यास प्राधान्य दिले जाईल. अर्जदाराने सर्व अटी मान्य असल्याचे तसेच संबंधीत वाहनाची योग्य ती काळजी घेण्याचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्जदार शासकीय, निमशासकीय, मंडळे अथवा महामंडळाचा कर्मचारी नसावा. तसेच दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या कर्जाचा थकबाकीदार नसावा. राज्यातील इतर कोणत्याही योजनेंतर्गत मोफत ई-वाहन प्राप्त झालेले दिव्यांग लाभार्थी सदर योजनेसाठी पात्र राहणार नाहीत. अधिक माहितीकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात संपर्क करावा.

# अंतर्मुख करणाऱ्या कविता....

आधुनिक केसरी

**बेंगळुरूला वास्तव्य असणारे साहित्यिक माननीय व्यंकटेश देवनपल्ली सरांचा "अंतर्मुख" नावाचा काव्यसंग्रह अलिकडेच वाचनात आला.ह्याचे वैशिष्ट्य म्हणजे श्री. रोक्कम कामेश्वर राव ह्या संवेदनशील कवीच्या तेलुगु कवितांचा भावानुवाद सरांनी केला आहे. देवनपल्ली सर मूळ तेलुगु भाषिक असून त्यांचे शिक्षण मराठीतून झाले आहे. त्यामुळे हा कुठेही भावानुवाद न वाटता मूळ कविता मराठीच वाटाव्यात असे शब्दप्रयोग त्यांनी केले आहेत. ते त्यांच्या मनोगतात म्हणतात "कवीला कुठलीही सीमा नसते, बंधन नसते. जमिनीत चैतन्याचे बीज रोवत, प्रकाश वाटत जाणारा आनंद प्रवाह म्हणजे कवी.**

ह्या संग्रहातील सगळ्याच कविता मनाला भिडणाऱ्या आहेत. वाचकांसाठी एक अंतर्मुख करणारी चिंतन यात्रा असे ह्या काव्यसंग्रहाबद्दल वाटल्याने देवनपल्ली सरांनी ह्या तेलुगु कविता मराठी वाचकांसाठी भावानुवादित केल्या आहेत. खरोखरीच प्रत्येक कविता वाचताना हा अनुभव येतो.

अपूर्व सृजन, परिवर्तन, अनाहत नाद, प्रवास, समर्पण अशी समर्पक शीर्षके असलेल्या ह्या कवितांमध्ये एक समान सूत्र आहे. जीवन म्हणजे एक उत्सवच आहे हे दर्शवणारे ते सूत्र आहे.

**ज्याच्या जगात तो**
**ज्याच्या मार्गावर तो**
**कोणत्याही बंधनाची**
**बांधिलकी नसणारी जवळीक**

आत्मीय संबंध कुठल्याही धाग्यांनी न बांधता येणारी नाती.....

अशी काही नाती आपल्याही जीवनप्रवासात आपल्यालाही भेटतात, त्यांच्या आत्मीय संबंधांमुळे जीवन समृद्ध होत जाते. अशा भावनांनी भरलेल्या ह्या कविता आहेत.

**एक प्रवास सुरू झाला आहे**
**हृदयाच्या आत घसरत चाललोय**
**निःशब्दता भेदून**
**शून्याला शोधतो आहे.**

अशा पंक्ती वाचून खरंच निःशब्द व्हायला होते. 'हृदयाच्या आत घसरत चाललोय' ह्या ओळी हृदयाचा ठाव घेतात. आपल्या अंतर्मनात काय भावना आहेत हे कित्येक वेळा आपल्यालाच माहिती नसते. आत आत जसजसे जाऊ तसतसे आपल्याला शोधण्याचा प्रवास जास्त समृद्ध होत जातो आहे. अंतिम गंतव्यस्थान ह्या कवितेत त्यांनी सामान्य माणसाची व्यथा मांडली आहे. बऱ्याच वेळा सामान्यांना आपल्या भावनांना योग्य शब्दरूप देणे कठीण जाते. ते काम ह्या कवितांनी नक्कीच केले आहे.

**डोळे उघडल्यापासून**
**भार वाहतोच आहे**
**अनंत दुःखांचे दैन्यांचे**
**पीठांच्या भोवती**
**मठांच्या भोवती**
**फिरुन फिरुन**
**थकून गेलो आहे**
**सर्व आठवणींच्या**
**व्यस्ततेच्या भाराला**
**उतरवून टाकून**
**झाडाखाली**
**थकवा दूर करतो आहे.**

सामान्य माणूस नेहमी आपल्या दुःखासाठी हेच करतो. आपल्या दुःख दैन्याच्या थकव्याचा भार फक्त निसर्गाच्या सान्निध्यातच हलका होऊ शकतो हे कवी जाणतो. कुठलेही मठ, पीठ ह्यासाठी काही उपयोगी नाहीत असे स्वतःच्या अनुभवातून सांगावे वाटते आहे.त्यामुळे सामान्य व्यक्तीला स्वतःचे चित्र ह्या ओळीत नक्कीच दिसते.

कवी जीवनात आशावादी आहे. तो म्हणतो

**मीच एक किरण आहे**
**तेजस्वी प्रकाश आहे**
**देह आत्म्याचा**
**दिव्य संगम आहे**
**मनाशी जोडलेले**
**जे प्रत्येक नाते आहे**
**ते सर्व काही सुंदर आहे**
**आनंदच आनंद आहे....**

ह्यातून कवीचा अध्यात्माचा अभ्यासही दिसून येतो. गीतेत सांगितल्याप्रमाणे सारे काही मीच आहे हा अद्वैताचा संदेश ही कविता देते असे वाटते आहे.

शेवटची मला एक जास्त आवडलेली कविता

**सदैव काहीतरी एक सांगावे**
**थोडासा प्रकाश वाटून द्यावा**
**समूहासोबत मिळून**
**स्वेच्छेने संचार करावेसे वाटते**
**गुदमरलेल्यासारखे होते**
**वेळ जाता जात नाही**
**खिडकी उघडतो**
**सर्वत्र वारा**
**थोडेसे चांदणे**
**काही तारे**
**ही रात्र निघून जाते**
**सकाळी उठताच सगळेच प्रश्न असतात**
**मी सांगितलेले चुकीचे म्हणणारे**
**मला हटायला सांगणारे**
**ओठ मुडपत**
**उपहासाने चिडवत**
**माझे सांगणेच गुन्हा आहे असे समजतात**
**मी थोडा वेळ मौन होतो.**
**पुन्हा ऐकणे पाहणे**
**सखोल निरीक्षण करत**
**अपस्वरांना काढून टाकत**
**स्वरांना जुळवून घेणे...**

जोपर्यंत श्रोते आहेत सांगणारा असायलाच पाहिजे....

आपल्या तथाकथित चुकांकडे इतक्या तटस्थपणे पाहून आपणच बदलायला हवे आणि आपले अनुभव श्रोत्यांपर्यंत पोचविले पाहिजे अशी खूणगाठ मनाशी बांधत कवीचा सृजनाचा प्रवास चालूच आहे.वाचकांना खरोखरच अंतर्मुख करायला लावणाऱ्या ह्या सगळ्या मुक्तछंदातल्या कविता आहेत. कुठेही जाणवले नाही की हा एक भावानुवाद आहे. हे आपल्या शब्दांचे सामर्थ्यच आहे. भाषा हे एक व्यक्त होण्याचे माध्यम आहे. एक पानभर लिहिलेल्या मजकुरापेक्षा कवितेच्या चार ओळी एखादा विशिष्ट संदेश जास्त परिणामकारकरीत्या देऊ शकतात. ह्या भावानुवादाने नक्कीच हे निर्विवादपणे सिद्ध केले आहे.

विशेष म्हणजे या काव्यसंग्रहाला धरणगावचे सुप्रसिद्ध कवि प्रा. बी.एन. चौधरी यांची अतिशय सुंदर रसग्रहणात्मक प्रस्तावना लाभलेली आहे.

काव्यसंग्रहः अंतर्मुख मूळ तेलुगु कविः रोक्कम कामेश्वरराव मराठी भावानुवादः व्यंकटेश देवनपल्ली पृष्ठ संख्याः 96, किंमत रू. 150/- प्रकाशकः स्वरूपदीप प्रकाशन, सोलापूर

सौ. रेवती कुलकर्णी,
बेंगलुरू, 98195 20117

# विकासातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व स्व.विनायकराव पाटील

आधुनिक केसरी

**मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. विनायकराव पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेले योगदान म्हणजे मराठवाड्याच्या विकासाला दिलेली चालना होय. अशा या विनायकरावांचा २८ डिसेंबर रोजी स्मृतीदिनानिमित्त.... मराठवाडा मागासलेला म्हणुन स्वातंत्र्यानंतरही अनेक तपापर्यंत ओळखला जात होता. याची खंत मराठवाड्यातील जनतेच्या मनात जशी सलत होती तशीच ती वैजापुर तालुक्यातील लोणी खुर्द येथील विनायकरावांच्या मनात सतत सलत होती. विकासापासून कोसो दूर असलेल्या मराठवाड्याचा विकास करायचा असेल तर अज्ञानाचा अंधकार नाहीसा केला पाहिजे. हे अण्णांनी ओळखले. ते स्वतः शिक्षकी पेशातले असल्यामुळे शिक्षणातील अडथळे कोणते याची त्यांना जाणीव होती.**

अण्णांचे कायद्याचे शिक्षण विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरात झाल्यामुळे छत्रपती शाहू महाराज, क्रांतीसुर्य महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, लोकमान्य टिळक, कर्मवीर भाऊराव पाटील, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील या शिक्षणप्रेमींचा चांगलाच प्रभाव त्यांच्यावर पडला होता. मोजक्याच ठिकाणी शिक्षणाच्या सुविधा असल्यामुळे मराठवाड्यातील अनेक गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिक्षणापासून वंचित होती. शिक्षणापासून दूर असलेल्या मुलांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून मराठवाड्यातील अज्ञानाची पाळेमुळे शोधून काढली आणि छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील नामांकित शिक्षण संस्थेतील शिक्षकाच्या नोकरीचा त्याग करून शिक्षणाचा प्रसार सुरू केला.

आपल्या भारतीय संस्कृतीत त्यागाला फार महत्व आहे. त्यागाची भावना सर्वांच्या ठायी मनात रुजविणे ही त्यागाची वृत्ती आहे. निस्वार्थीपणाची भावना अवघ्या महाराष्ट्रातल्या माणसात छत्रपती शिवाजी महाराजांपासून जोपासलेली आहे. त्याग, दान, माणुसकी हा तर मराठी मातीचा आत्मा आहे. याच दृष्टीकोनातून विनायक अण्णांचा हेवा वाटतो. मराठवाड्यात जर विकास साधायचा असेल तर शिक्षणाशिवाय दुसरे प्रभावी साधन नाही. याच जाणीवेतून दादासाहेब सावंत, बाळासाहेब पवार, रामचंद्र पाटील, मधुकर मुळे, भानुदासराव चव्हाण, बाबुराव काळे, शेख अहमद शेख चाँद, रामराव आवरगावकर यांच्यासारख्या अनेक विश्वासू सहकाऱ्यांना सोबत घेवून विनायकराव पाटील यांनी स्वतःच्या जन्म दिवसाचे औचित्य साधून १ सप्टेंबर १९५८ रोजी 'मराठवाडा शिक्षण प्रसार मंडळ' या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली आणि मराठवाड्यात ज्ञानज्योत पेटविली. विनायक अण्णांनी १९५८ मध्ये लावलेल्या या छोट्याशा ज्ञानरुपी रोपट्याचे आज विशाल वृक्षात रुपांतर झाले असून त्या वृक्षाच्या फांद्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) ,परभणी, बीड, जालना, हिंगोली या जिल्ह्यातही पसरल्या असून शिक्षणापासून वंचित असणारी लाखो गोर-गरीबांची मुले या महाकाय ज्ञानरुपी वृक्षाखाली बसुन ज्ञानाची गोड फळे चाखताना बघायला मिळत आहेत.

विचारशैली आणि वकृत्व ज्या व्यक्तीकडे असेल त्या व्यक्तीचा समोरच्या व्यक्तीवर लवकर प्रभाव पडतो. हे तत्व विनायकरावांच्या बाबतीत तंतोतंत लागु होते. त्यांच्याकडे हे गुण असल्यामुळे 'मराठवाडा विभागीय दारुबंदीचे



अध्यक्ष' पद त्यांच्याकडे चालून आले आणि तिथून त्यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. दारुबंदीचे अध्यक्ष झाल्यानंतर अण्णांनी संपूर्ण मराठवाड्यात जनजागृती मोहीम सुरू केली. दारुमुळे उद्ध्वस्त झालेले अनेकांचे संसार नव्याने उभे केले. त्यामुळे जनमाणसांत अण्णांची चांगली प्रतिमा निर्माण झाली. जनसामान्यांतला परिस म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाऊ लागले. सर्वसामान्य माणुस विनायकरावांच्या चळवळीत ओढला गेला. त्यामुळे त्यांचे पाठबळ अधिक वाढले आणि या प्रभावशाली व्यक्तीमत्वाची चाहुल जशी मराठवाड्याला झाली तशीच ती यशवंतराव चव्हाण यांना झाल्यावाचून राहिली नाही. महाराष्ट्र काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाची धुरा विनायकरावांकडे सोपविण्यात आली. लालबहादूर शास्त्री, पंडीत जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी या केंद्रीय नेतृत्वात व यशवंतराव चव्हाण यांच्या तालमीत महाराष्ट्रात विनायकराव अण्णांच्या रुपाने एक नवा राजकीय उदय झाला. प्रदेशाध्यक्षपदाची धुरा घेतल्यानंतर अण्णांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. अनेक ठिकाणी मेळावे, सभा, भेटी गाठी घेतल्या. त्यातून पक्ष संघटनेच्या कामाला गती मिळाली. पक्षाची ध्येय धोरणे अत्यंत प्रभावीपणे सर्वसामान्य व तळागाळातील माणसांपर्यंत पोहोचविल्यामुळे अनेकजण काँग्रेस पक्षाकडे आकर्षीले गेले.

संपूर्ण महाराष्ट्रात विनायकरावांचा झंझावात सुरू असताना महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका लागल्या. १९६७ च्या निवडणुकीचे वारे महाराष्ट्रात धोंगावत असताना पुन्हा एकदा पक्ष श्रेष्ठींनी विनायकरावांवर महाराष्ट्राचे स्टार प्रचारक म्हणून जबाबदारी दिली आणि त्याचवेळी वैजापूर विधानसभा मतदार संघातून उमेदवारी पण देण्यात आली. परंतु पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व स्टार प्रचारक असल्यामुळे अण्णांना स्वतःच्या मतदारसंघात जास्त सभा घेता आल्या नाहीत. तरी देखील जनतेने प्रचंड आत्मविश्वास व जनमाणसात निर्माण केलेली ओळख यामुळे विनायकरावांना वैजापूर तालुक्यातील जनतेने प्रचंड मताधिक्याने निवडून दिले आणि अण्णांना सहकारीमंत्री बनविण्यात आले. सहकार मंत्री झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय त्यांनी घेतले. जलसिंचनाच्या दृष्टीने मन्याड, नारंगी सारंगी, नांदूर मधमेश्वर यासारख्या अनेक प्रकल्पांच्या माध्यमातून तालुका ओलीताखाली आणून हरितक्रांती घडविली. औद्योगिक क्षेत्रातही विनायकरावांनी आपल्या कार्यकाळात मृतरुप देण्याचे काम केले आहे. परंतु मराठवाड्यातील विकसनशील नेतृत्वाचे आजारपणात उपचारा दरम्यान २८ डिसेंबर १९६८ रोजी निधन झाले आणि मराठवाड्याच्या विकासाची गती मंदावली. त्यामुळे आजही विनायकराव अण्णांची उणीव मराठवाडावासियांना झाल्याशिवाय राहत नाही, हेही तितकेच खरे!

कुंडलिक वाळेकर
मो.७५८८२५०००१

# नवीन वर्षाच्या स्वागतासाठी अवघी तरुणाई सज्ज....

आधुनिक केसरी

२०२३ हे साल संपायला आणि नूतनवर्षारंभ व्हायला अगदी काही दिवसांचा कालावधी राहिला असून काऊंटडाऊन सुरु झाले आहे त्यामुळे शहरी भागासह गावगाड्यात सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अवघी तरुणाई सज्ज झाली आहे पाश्चिमात संस्कृतीचे फॅड घेवून आजचा तरुणवर्गाला थर्टी फर्स्ट डे म्हणजे एक प्रकारची मेजवानीच असते ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री १२ वाजता फटाक्यांची आतषबाजी,डिजे, गाड्यांच्या पुंगळ्या काढून कर्णकर्कश मोठंमोठ्या आवाजाने प्रमुख मार्गावरुन गाडी पळवली जाते त्यामुळे अनेकांना त्रासाचे ठरु शकते कोणत्याही दिवस साजरा करताना उत्साह,आनंद असावा मात्र उन्माद नसावा आपला उत्साह दुसऱ्यासाठी धोक्याच्या अथवा त्रासाचा ठरेल असा कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची पुरेपूर काळजी तरुणाईने घेतली पाहिजे तरच त्या दिवसाचे सार्थक होईल थर्टी फर्स्ट डे साजरा करण्यासाठी अनेकजण हॉटेल बुक करत आहेत तर काहीजण फार्म हाऊस, शेतशिवारात,रांनमाळात, सर्व सोयीनुक्त ठिकाणाची निवड करताना दिसत आहेत तर नविन वर्षाची सुरुवात चांगल्या संस्कारातून व्हावी म्हणून विविध देवदेवतांच्या दर्शनासाठी तिर्थयात्रेच्या नियोजनात आहेत तर काहिजन पर्यटनाचे बेत आखत आहेत काही ठिकाणी भजन,किर्तन,प्रवचन सोहळ्याचे सुद्धा नियोजन आहे तसे पाहायला गेले तर नविनवर्षारंभ मराठी महिन्यात गुढीपाडव्यापासून सुरु होते मात्र आपण या दिवशी नविन वर्षाची सुरुवात न करता थर्टी फर्स्ट पासून करतो हे विदेशी संस्कृतीचे अनुकरण म्हंटले तर वावगे ठरणार नाही या दिवशी उत्सव साजरा करण्यास काहीच हरकत नाही पण या उत्साहाला गालबोट लागू नये याची दक्षता घेतली पाहिजे ३१ डिसेंबर दणक्यात साजरा व्हावा सर्वांच्या सलोख्याने,आपापल्या परीने अतिमद्य प्राशन नको सरत्या वर्षाला निरोप देवून प्रत्येक व्यक्तीकडून सत्कर्म घडो अशी सदिच्छा व्यक्त करुन,आगामी येणारे नवीन वर्ष २०२४ आपल्यासाठी निरामय,उत्कर्षाचे, भरभराटीचे,आनंददायी ठरो,हीच सर्वांसाठी शुभेच्छा !

राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव





सविता कुरुंदवाडे
८७८८९२३०३८

# वाचन चळवळीवर उमटलेली ठसठशीत मुद्रा : अक्षर मुद्रा

आधुनिक केसरी

**गेल्या वर्षीचा अक्षर मुद्रा 2022 चा दिवाळी अंक, लेखकांना भावलेली पुस्तके या विषयाला समर्पित होता.त्या अंकातील दर्जेदार विषयांची मांडणी व उत्कृष्ट दर्जा यामुळे अक्षर मुद्राच्या यावर्षीच्या अंकाचीही उत्कंठा होती. गेल्या वेळेपेक्षा काकणभर सरस असा हा दिवाळी अंक 2023 निश्चितच आपल्या संग्रही असायला हवा. मला प्रभावित केलेले पुस्तक, सृजन, आणि हरवत चाललेली माणुसकी , या तीन भागात एकूण 33 लेखकांनी लेख लिहिले आहेत.**

खरंतर सर्वच लेख अत्यंत प्रभावी व ओघवत्या भाषेतले आहेत. त्यातल्या काहींची विशेष नोंद घेणे मला आवश्यक वाटते.

**अंकांचा पहिला भाग :** प्रभावित केलेले पुस्तक. यातील चौकटी बाहेरचे जगणे अशक्य आहे हा श्री रवी प्रकाश कुलकर्णी यांनी लिहिलेला लेख,ज्यात त्यांनी पुण्यासारख्या मध्यवर्ती ठिकाणाचे सुखाचे आयुष्य सोडून कोकणातल्या पंचनदी आणि कुडावळे या गावात आयुष्याची अनेक वर्ष काढली. अशा ध्येयासक्त व निसर्गभक्त कुलकर्णी दांपत्याविषयी माहिती दिली आहे.त्यांच्या अनुभवाची माहिती करून देणारे 'स्वप्नमधील भावा' या पुस्तकाविषयी इत्यंभूत माहिती दिली आहे. हा लेख वाचून झाल्यावर जगण्याचे भान आणणारे हे पुस्तक आपण नक्की वाचायला हवे असे प्रकर्षाने वाटून जाते. प्राध्यापक अविनाश कोल्हे यांनी धर्मश्रद्धा केंद्रस्थानी असलेली जागतिक दर्जाची इंग्रजी भाषेत असलेली कादंबरी ग्राहम ग्रीन लिखित, द पावर अँड द ग्लोरी याबाबत लिहिले आहे. अनेक पुस्तकांचे परीक्षण तसेच नाटकांचे परीक्षक म्हणून काम पाहणाऱ्या अविनाश कोल्हे यांना पुस्तकाचे नेमके मर्म समजले आहे हे वेगळे सांगायला नको .त्यांनी सुरुवातीला लेखक ग्राहम ग्रीन यांच्या लेखन वैशिष्ट्याची ओळख करून दिली आहे.नोबेल पुरस्कारासाठी तीन वेळा नामांकन असलेले हे लेखक आणि त्यांच्या इतरही पुस्तकांबद्दल अविनाश कोल्हे यांनी भाष्य केले आहे.धर्मगुरू आणि समाजव्यवस्थेतील नातेसंबंधांचा ताणतणाव , लेखकाने कौशल्याने केलेली या कादंबरीची रचना,धर्मश्रद्धा आणि राज्यसत्ता यातील सनातन झगडा, मार्क्सवादाने जगाला धर्माबद्दल दिलेली नवीन जाणीव...पुस्तकातील ही सर्व बलस्थाने अविनाश कोल्हे यांनी प्रभावीपणे वाचकांसमोर ठेवली आहेत.इंग्रजी भाषेत उपलब्ध असलेल्या जागतिक साहित्याची ओळख प्रा. कोल्हे यांच्यामुळे अधोरेखित होते. वैश्विक विषयाचे वैयक्तिक कांगोरे दाखवणारे डॉ. संजय कुलकर्णी यांनी 'जाग, जागा आणि जग' या लेखात जगण्याची जाणीव समृद्ध केली आहे.'एका आदिम किलबिलाटाच्या कडेलोटाचा लोकार्पण सोहळा..' या वास्तवाचे भान देणाऱ्या कविते बरोबर संपणारा हा लेख आपण निसर्गाचं देणं आहोत याचे भान जागवतो .

'केशवसुतांची कविताः काळावर उमटलेली अक्षरमुद्रा' हा डॉ. नीलमा गुंडी यांचा लेख, जगाचा अर्थ समजावणारी पाच पुस्तके हा श्री. सुकल्प कारंजेकर यांचा लेख तर मॅकले खलनायक की नवभारताचा निर्माता ? हा डॉ दत्तप्रसाद दाभोळकर यांच्या लेखांच्या उल्लेखाशिवाय हा भाग पूर्ण होऊच शकत नाही.


**अंकाचा दुसरा भाग : सृजन**

यात एकूण तीन लेख आहेत 'एका भारतीय नेत्याचा' उदय हा प्रा. दत्ता भगत यांनी लिहिलेला लेख म्हणजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे थोडक्यात चरित्र आहे.'योद्धा' हा प्रा. डॉ. शंकर विभुते यांचा करोना काळातील संघर्षावर आधारित लेख वाचायलाच हवा असा आहे. परंतु मी स्वतः नेहमीच स्त्रीवादी भूमिकेतून लिखाण करत असल्याने मला 'तिची परीक्षा' हा प्रा. डॉ. माधव जाधव यांच्या कथे विषयी विशेष आत्मीयता वाटली.ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या लग्न झालेल्या मुली भोवती फिरणारी ही कहाणी प्रत्यक्षात मात्र फक्त तीन पुरुषांच्या संवादातून आपल्यापुढे उलगडत जाते .कहाणीच्या शेवटास आपल मन वास्तवाच्या जाणीवेने सुन्न होतं . खरोखरच अप्रतिम जमलीय कथा.

**तिसरा भाग :** हरवत चाललेली माणुसकी.

यात मराठवाड्याचा वृद्धाश्रम टाळायचा तर, माणुसकी टिकवून ठेवण्याची जबाबदारी कुणाची,सात संदुको मे दफन कर दो नफरतें, आपला सुसंस्कृतपणा गेला कुठे ? प्रेमाची भाषा ,असे एकाहून एक बोलके, सरस आणि संवेदनशील लेख वाचकांना खिळवून ठेवतात. "माणुसकीच्या शत्रुसंगे युद्ध आमचे सुरू" हा सौ वृंदा दिवाण यांचा लेख फारच सकारात्मक आहे . आपली समाज रचना, समाजातील आपले हक्क, सन्मार्गासाठी भागवत भक्तीची गरज...भारताचे स्वातंत्र्य व फाळणी, तरुण पिढीचे परदेशाचे कायम वास्तव्यासाठीचे आकर्षण.. या सगळ्या मुद्द्यांचा उहापोह करून शेवटी जगाला प्रेम अर्पावे असे सांगणाऱ्या साने गुरुजींची त्या आठवण करून देतात. बाका प्रसंग उद्‌भवला तर अजूनही माणसे एकमेकांना मदत करतात. माणुसकी हरवत चालली आहे असे वाटताना तिचा पुन्हा पुन्हा नव्या रूपाने अनुभव येतोच हे लक्षात ठेवावे आणि काळावर भरोसा ठेवून आपला दिनक्रम पार पाडावा हेच इष्ट. असे अत्यंत समर्पक आशावादी भाष्य या लेखात आहे. अंकाच्या शेवटी 'कहाणी अक्षरमुद्राची' हा अक्षर मुद्राचा प्रवास आणि त्यातील अडथळ्यांचा आराखडा संपादक श्री दीपक चिद्दरवार यांनी मांडला आहे. एकूण या वाचनीय अंकात मध्ये मध्ये येणाऱ्या जाहिराती नाहीत.सर्वच लेखकांचे लेखन विषयाला अनुसरून झालेले आहे.अंकावर आकर्षक शिल्पचित्र असलेले मुखपृष्ठ व इतर चित्र हिंगोलीच्या श्री परसावळे यांचे आहेत.

खरोखरच वाचन संस्कृतीला वाहिलेला अक्षर मुद्राचा हा दुसरा दिवाळीअंक आपल्या संग्रहात असायलाच हवा.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# सोशल मीडियाचा अतिवापर आत्महत्येला कारणीभूत

आधुनिक केसरी

**स्मार्टफोन ही केव्हा गरजेतून सवय झाली हे आम्हाला कळलेही नाही. आपण कुठेही असो, एकटे असो की गर्दीत, आपल्याभोवती स्मार्टफोन असतात. हे आपल्याला आजारी बनवत आहेत. मानसिक आणि शारीरिक दोन्ही. स्मार्टफोनचा अतिवापर आपल्याला थकवणारा आहे. त्यामुळे नैराश्य आणि चिंता निर्माण होत आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, आम्हाला आमच्या स्मार्टफोनपासून दूर राहणे अशक्य झाले आहे. अभ्यासात असे दिसून आले आहे की स्मार्टफोन आणि सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे मानसिक समस्या आणि तरुणांमध्ये आत्महत्येचा धोका वाढू शकतो. कॅनेडियन मेडिकल असोसिएशन जर्नलमध्ये अलीकडेच प्रकाशित झालेल्या अनेक अभ्यासांचे पुनरावलोकन स्मार्टफोन वापरावर केंद्रित आहे.**

स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचा अतिवापर तरुणांमध्ये मानसिक समस्या आणि आत्महत्येला कारणीभूत ठरत आहे. अभ्यासानुसार, संशोधकांचा असा विश्वास आहे की तरुणांमध्ये स्मार्टफोन आणि फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप, इन्स्टाग्राम इत्यादी सोशल मीडियाचा अतिवापर केल्याने मानसिक विकार आणि आत्महत्येचा धोका वाढू शकतो. कॅनडातील टोरंटो वेस्टर्न हॉस्पिटलच्या एलिया अबी-जाउड म्हणाल्या, "कॅनडातील आजारी मुलांसाठी डॉक्टर, शिक्षक आणि कुटुंबीयांनी स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचे संभाव्य हानिकारक प्रभाव कमी करण्यासाठी तरुणांसोबत काम करणे आवश्यक आहे." हे विश्लेषण इतर संशोधकांसह संशोधकांनी केले. , मुलांना किंवा तरुणांना स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचा वापर व्यवस्थापित करण्यास कशी मदत करावी याबद्दल डॉक्टर, पालक आणि शिक्षक यांच्या मार्गदर्शनाचा समावेश आहे. तरुणांच्या मानसिक आरोग्याच्या



क्षेत्रात काम करणाऱ्या डॉक्टर आणि संशोधकांनी विचारात घेतलेल्या घटकांपैकी हे निष्कर्ष असावेत असे संशोधकांनी सांगितले. "सोशल मीडियावरील संभाव्य हानी कमी करण्यासाठी तरुणांना व्यस्त ठेवण्याचे महत्त्व लक्षात घेता, प्रतिबंधात्मक दृष्टीकोन प्रतिकूल असेल," असे संशोधकांनी एका निवेदनात म्हटले आहे. ते म्हणतात की "तरुण किशोरवयीन मुलांसाठी, ज्यांना सोशल मीडियाशिवाय जग माहित नाही, डिजिटल परस्परसंवाद हा सर्वसामान्य प्रमाण आहे. संशोधकांनी नमूद केले की, फायदे आणि उत्पादक मानसिक आरोग्य माहिती तसेच इंटरनेट-आधारित टॉकिंग थेरपी सारख्या संसाधनांमध्ये प्रवेश करण्यासाठी कमी अडथळे लक्षात घेऊन ऑनलाइन प्रवेशास सूट दिली जाऊ शकत नाही. त्यामध्ये माध्यम साक्षरता किंवा डिजिटल साक्षरता, सर्जनशीलता, स्व-अभिव्यक्ती, आपलेपणाची भावना आणि नागरी प्रतिबद्धता यांचा समावेश होतो. संशोधकांनी सांगितले की नुकत्याच झालेल्या यूएस सर्वेक्षणात असे सूचित केले आहे की ५४ टक्के किशोरांना वाटते की ते त्यांच्या स्मार्टफोनवर जास्त वेळ घालवतात आणि जवळपास निम्म्याने असे म्हटले आहे की ते वापर कमी करत आहेत. "उत्साहाने, तरुण लोक त्यांच्या जीवनावर सोशल मीडियाचा नकारात्मक प्रभाव ओळखत आहेत आणि ते कमी करण्यासाठी पावले उचलू लागले आहेत," ते म्हणाले. स्मार्टफोनचा अतिवापर स्मार्टफोन मानसिक समस्यांचे कारण बनत आहे स्मार्टफोन आणि मानसिक आरोग्य सोशल मीडियाचा अतिवापर धोकादायक आहे.

स्मार्टफोन' संदर्भात आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. अमेरिकेतील टेक्सास राज्यातील 'सेपियन लॅब्स'ने केलेल्या संशोधनानुसार, १८ ते २४ वर्षे वयोगटातील तरुणांचे मानसिक आरोग्य बिघडण्यास 'स्मार्टफोन' कारणीभूत ठरू शकतो. जेव्हा इंटरनेट उपलब्ध नव्हते, तेव्हा १८ वर्षांपर्यंतचे तरुण दिवसातील १५ ते १८ हजार तास त्यांच्या मित्र आणि कुटुंबियांसोबत घालवायचे. आता ही वेळ ५ हजार तासांवर आली आहे. तपशील पुढे सांगतात की जे लोक जास्त प्रमाणात स्मार्टफोन वापरतात त्यांच्या मनात आत्महत्येचे विचार येतात.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# नववर्षाचे स्वागत करा, जरा जपून!

आधुनिक केसरी

**भारतासह महाराष्ट्रातील नागरिकांनी 31 डिसेंबर 2023 ला निरोप देतांना व नवीन वर्षाचे म्हणजेच 2024 चे स्वागत करतांना वाढत्या दुर्घटना पहाता मद्यपिऊन वाहन चालवु नये, स्टंटबाजी करू नये,वाहन चालवितांना मोबाइलवर बोलने टाळावेत,जास्त जल्लोष टाळला पाहिजे.प्रशासन किंवा पोलिस विभाग यांना सहकार्य करुन नियमांचे काटेकोरपणे पालन करावे,नवीन करोनाचा धोका हाता सर्वांनीच सावधगिरीने नवीन वर्षाचे स्वागत करावे,मास्कचा वापर करावा.कारण पुढे चालून परिस्थिती गंभीर होणार नाही याकरिता स्वत:वर सर्वांनीच नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.**

आता करोणाच्या चौथ्या जेएन-1 या व्हेरिएंटने प्रवेश केला आहे किंवा करीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रत्येकांनी सावध रहाणे गरजेचे आहे.2020 व 2021 ने संपूर्ण जगाला दुःखाच्या सागरात लोटले होते.करोणा संक्रमणामुळे अनेक हासते-खेळते परिवार उध्दवस्त झाले व अनेकांचा रोजगार गेला.यामुळे जगावर आर्थिक संकट सुध्दा ओढवले होते. त्यावेळेस भारतासह संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था ढासळली सुद्धा होती.संपुर्ण जग शांततेने जीवन जगत होते.परंतु करोणाच्या रूपाने चीनने विषाणू पसरवून मृत्यूचे तांडव निर्माण केले होते.वाढते प्रदुषण पहाता सर्वांनीच मास्क लावने गरजेचे आहे,जगातील कोणतीही महामारी असो, वाढते प्रदुषन, ग्लोबल वॉर्मीग,जंगल तोड, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर,परमाणु परीक्षण, युद्धजन्य परिस्थिती, पृथ्वीवरील वाढता दारूगोळा इत्यादी अनेक कारणांमुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे व यामुळे जमिनीमध्ये विषारी घटक जाऊन भूजलसाठा दुषित होत आहे.याचे प्रायचीत्य जगातील संपूर्ण जीव सृष्टीसह,मानव,जीव-जंतु भोगत आहे आणि या संपूर्ण घटनेला जबाबदार आहे फक्त मानवजातीच आहे,मग ती कोणत्याही देशाची असो.म्हणेच आज मानवाने स्वतःहुन "मौत का कुंवा"खोदुन ठेवला आहे.करोणा महामारी ही मानवाचीच देन आहे.म्हणजेच आज मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी जगाचे वाटोळे केले आणि मृत्यूला कवटाळण्यासाठी "आ बैल मुझे मार"अशी परिस्थिती निर्माण केली आहे.त्यामुळे जगाने करोणा महामारीपासुन काहीतरी धडा घेतला पाहिजे व निसर्गाचे संतुलन स्थीर ठेवण्यावर जोर दिला पाहिजे.

2020 व 2021 ने जगाच्या प्रत्येक देशांना अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या जखमा व घाव घातले हे कोन्हीही विसरणार नाही.या संपूर्ण जखमा भरून काढण्याची संपूर्ण मानवजात एकवटली पाहिजे व 2024 चे स्वागत केले पाहिजे. जनतेला मी आग्रह करतो की 2024 आला म्हणून हवेत उडु नका किंवा अतिरेक करू नका.कारण नवीन जेएन-1 या व्हेरिएंटने जगात प्रवेश केला आहे व करोनाचा धोका दाराशी येऊन उभा आहे.त्यामुळे मास्कचा वापर करने काळाची गरज आहे.2020 व 2021 ने मंदिर-मज्जीद,गुरूव्दारा,चर्च, बौद्ध विहार इत्यादी अनेक धार्मिक देवस्थान व पर्यटन स्थळांपासुन जगातील संपूर्ण मानवजातीला दुरावले गेले होते.परंतु आता 2024 मध्ये पुर्वीसारखी परिस्थिती उद्‌भवणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.त्यामुळे 2024 या नवीन वर्षात प्रवेश करतांना करोणा महामारी व इतर परिस्थिती पाहता सर्वांनीच सावधगिरी बाळगली पाहिजे व नवीन वर्षाचे स्वागत साधेपणाने व आनंदाने साजरे केले पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे.नववर्षाच्या निमित्ताने भारतासह महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीने




एक वृक्ष लावुन नवीन वर्षाचे स्वागत करावे. यामुळे एकाचवेळी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल.यामुळे गुरांना चारा व मानवाला शुद्ध हवा आणि ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. यामुळे प्रदूषणावर मात करता येईल.देशात जेएन-1 करोनाच्या व्हेरिएंटचा धोका पहाता नवीन वर्षाच्या निमित्ताने सर्वांनीच जागरूक व सावध असलेच पाहिजे.नवीन वर्षाचे स्वागत सर्वांनीच अवश्य केले पाहिजे परंतु जरा जपून!आपण सर्वांनीच शपथ घेतली पाहिजे की नवीन वर्षात नवीन संकल्प, नवीन उमंग, नवी आशा, नवीन दिशा, नवीन आकांक्षा निर्माण व्हावी याच उद्देशाने पुढचे पाऊल टाकावे व येणाऱ्या नवीन व्हेरिएंटच्या करोनाला रोखण्यासाठी सर्वांनीच कटीबद्ध रहाले पाहिजे. राज्य सरकारने 31 डिसेंबर2023च्या निमित्ताने व 2024 च्या आगमनाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचे आदेश प्रशासनाला दिले पाहिजे.यातच नवीन वर्षाचे खरे स्वागत दिसून येईल व 2024 वर्षांचा हा आगळावेगळा उपक्रम अनंत काळापर्यंत सर्वांच्याच स्मरणात राहील.नवीन वर्षांच्या हार्दिक शुभेच्छा!जय हिंद!

# कसेल त्याची जमीन म्हणजे तरी काय ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**मूळतः कुळकायद्यान्वये शेतीवर अवलंबुन असणाऱ्या व्यक्तींच्या हक्काचे रक्षण व्हावे, त्यांना कुळ हक्काने मिळालेल्या जमिनी समाजातील वर्गाकडून खरेदी होवून कुळ भूमिहिन होवू नये व त्यांच्या उदरनिर्वाहाची समस्या उद्भवू नये, यासाठी सदर जमीन विक्रीकरीता बंदी घालण्यात आलेली आहे. कुळकायदा: स्वातंत्र्यपूर्व काळाचा विचार केला तर त्या काळात लोकसंख्या कमी होती. गावात इनाम जमीन, वैयक्तिक जमीनी असे क्षेत्र मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. त्यामुळे गावातील ज्या लोकांना जमिनी नव्हत्या किंवा ज्यांचे क्षेत्र तुलनेने फारच कमी होते, असे लोक जास्तीचे उत्पन्न व उदर निर्वाह या उद्देशाने इतर व्यक्तींच्या जमीनी कसण्यासाठी घेत. उत्पन्नातील ठरावीक हिस्सा देवून अशा जमीनी वर्षानुवर्षे कसल्या जात होत्या.**

या सर्व बाबींचा विचार करून "कसेल त्याची जमीन" हे तत्व पुढे आले व या तत्वाला प्राधान्य देण्यात आले. या तत्वाचा आधार घेवूनच कुळकायद्याची निर्मीती करण्यात व निकष ठरविण्यात आले. जमिनीचा ताबा देणे बाबत सामाजिक परिस्थिती, विरोध करणाऱ्या वर्गाची भावना या सर्वांचा अभ्यास करण्यात आला. त्यानुसार कुळकायदा व त्यात टप्पा टप्प्याने बदल करण्यात आले. सन १९३९, सन १९४५, सन १९४७, सन १९४८, सन १९५५ व सन १९५७ मध्ये विविध सुधारणा व अंमलबजावणीचे निर्देश देण्यात आले.

कायद्याने कुळ व कायम कुळ असे दोन प्रकार पडतात. या विषयी माहिती असल्यास कुळ व कायम कुळ यातील फरक चटकन ध्यानात येईल. या दोन्ही व्याख्येत सन १९५५ या वर्षाला फार महत्त्व आहे. कारण त्यापूर्वी व त्यानंतरच्या कुळाचा फरक लक्षात येईल. कुळ म्हणजे काय? तर दुसऱ्या व्यक्तीच्या मालकीची शेतजमीन प्रत्यक्ष कष्टाने कसणारा व्यक्ती यास कुळ असे म्हणतात. या ठिकाणी कसेल त्याची जमीन या तत्वाने ही व्याख्या मांडण्यात येत आहे आणि कायम कुळ म्हणजे काय? तर कुळकायदा अस्तित्वात आल्यापासून त्यात टप्पा टप्प्याने बदल करण्यात आले. यातील सन १९५५ मध्ये झालेले बदल म्हणजेच सुधारणा महत्त्वाची ठरते. या सुधारणेपासूनच कायम कुळ अस्तित्वात आले आहे. सन १९५५ पूर्वी वहिवाट, परंपरा, रुढी व कोर्टाच्या निकालामुळे ज्यांचे नांवे हक्कनोंदणी पत्रकात नमुद झाले त्यांना कायम कुळ असे म्हणतात.

**कुळ निर्माण होण्याची कारणे:** कुळकायद्यानुसार कसेल त्याची जमीन या तत्वाला महत्त्व देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे या काद्यात जातीने जमीन कसणे हे तत्व देखील तितकेच महत्त्वाचे आहे. कुळनिर्मीतीची कारणे समजून घेण्यापूर्वी जातीने जमीन कसणे म्हणजे काय? या अंतर्गत कोणत्या बाबींना जातीने जमीन कसणे असे म्हणावे, हे समजून घेतले पाहिजे. जातीने जमीन कसणे म्हणजे नेमके काय करणे? तर जेव्हा एखादा शेतमालक जातीने जमीन कसत नसेल, तेव्हा त्या जमिनीवर कुळ निर्माण होतात, असे म्हणता येईल. जातीने जमीन कसणे या व्याख्येत खालील बाबी येताता- १. जमीनमालकाने स्वतः अंगमेहनतीने कष्टाने जमीन कसणे, २. जमीनमालकाच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती अंगमेहनतीने जमीन कसणे, ३. जमीनमालकाच्या स्वतःच्या किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या देखरेखीखाली, मजूर कामाला घेवून व त्या मजुरांना वेतन देवून जमीन कसणे होय. जेव्हा जातीने जमीन कसली जात नसेल, तेव्हा कुळ निर्माण होतात. त्या मध्ये- १. आजच्या स्थितीत दुसऱ्याच्या मालकीची जमीन एखादा व्यक्ती कायदेशीररित्या कसत असेल व सदर जमीन मालकाकडून जातीने कसली जात नसेल, तर कुळ निर्माण होते. या ठिकाणी जातीने याचा अर्थ प्रत्यक्ष कष्ट करून असा आहे. यातही सदर जमीन कसणारी व्यक्ती- अ. जमीन मालकाच्या कुंटुंबातील नसावा, ब. सदर व्यक्ती जमीन गहाण घेणारा नसावा, क. सदर व्यक्ती पगारावर ठेवलेला नोकर नसावा, ड. सदर व्यक्ती जमीन मालकाच्या देखरेखीखाली जमीन कसत नसला पाहिजे, ई. एखादी व्यक्ती जातीने जमीन कसणे या व्याख्येत उपरोक्त मुद्द्यातील क मधील मजुरा कडून किंवा व्यक्ती कडून जमीन कसणे या घटकात जर जमीन पीकाच्या हिस्स्याच्या रुपाने मोबदला किंवा मजूरी देत असेल, तेव्हा तो कुळ ठरू शकतो. फ. कुळ व कुळाची निर्मीती या व्याख्येत कायद्यान्वये खालील घटकांना महत्तवाचे स्थान आहे. ते समजून घेतले पाहिजे- अ. दुसऱ्या व्यक्तीची जमीन अन्य व्यक्तीने कायदेशीर वैधरित्या कसत असणे. ब. जमीन मालक व कुळ यांच्यात तोडी करार, क. जमीन कसणारा अन्य व्यक्ती खंड देत असणे. ख. जमीन मालक व कुळ यांच्यातील सामाजिक नाते व पारंपारिकरित्या जपलेले मालक व कुळ संबंध.



वरील सर्व मुद्द्यांचा कुळ कायद्यान्वये विचार करण्यात आलेला आहे. बऱ्याच वेळा असा समजही प्रचलीत आहे की, आपण सदर जमीन कसत आहात म्हणजे आपण कुळ हक्क दर्शवू शकतो. वरील परिस्थिती आपल्या अनुरुप असली तरी लगेचच कुळ निर्माण होत नाहीत. कुळ निर्मीतीसाठी निश्चित परिस्थितीती, अतिरिक्त जमीनी व ठरावीक काळ यांचे अनन्य साधारण महत्त्व आहे. कुळकायदा कलम ३२ ग नुसार दिनांक ०१/०४/१९५७ रोजी जमीन कसणाऱ्या माणसाला मालक म्हणून जाहिर केले आहे. परंतू आज रोजी जमीनीत नव्याने कुळ निर्माण होवू शकतो काय? व असल्यास कशा पध्दतीने कुळ निर्माण होतो? याबाबत प्रचंड कुतुहल आहे. याबाबतची तरतुद कुळकायद्याच्या कलम ३२ ओ मध्ये नमुद करण्यात आली आहे. कुळकायदा कलम ३२ ओ नुसार आजही दुसऱ्याची जमीन कायदेशीररित्या एक वर्ष जरी दुसरा इसम कसत असेल तर तो कुळ असल्याचा दावा करू शकतो. तथापी त्यासाठी खालील बाबी महत्त्वाच्या ठरतात- वहिवाटदार व मालक यांच्यात करार झाला पाहिजे. तो मालकाकडून जमीन कसत असला पाहिजे. तो खंड देत असला पाहिजे आणि जमीनमालक व कुळ असे विशिष्ट नातेसंबंध असले पाहिजेत. आजकाल जमीन मालक स्वतःहून कोणतेही करार वहिवाटदाराशी करीत नसल्यामुळे कलम ३२ ओ च्या दाव्यांची संख्या अत्यल्प आहे. जमीन मालकांमध्ये जागृती निर्माण झाल्यामुळे अशा पध्दतीचे कोणतेही करार ते वहिवाटदारासोबत करत नाहीत. तथापी आधी पिक पाहणीला नांव लावून घ्यावयाचे व एक वर्षाच्या पिक पहाणीचा ७/१२ जोडून दिवाणी न्यायालयातून जमीन मालकाला जमीनीत यायला मनाई आदेश आणावयाचे व त्यानंतर काही दिवसांनी कलम ३२ ओ नुसार कुळ असल्याचा दावा करावयाचा, अशाप्रकारे वहिवाटदार व्यक्ती कुळ असल्याचा दावा सर्वसाधारणपणे करतात. कुळ हक्कः जमीन कसणाऱ्या कुळांचे किंवा मालकांचे कुळ हक्कासंबंधी काही महत्त्वाचे मुद्दे असून ते समजून घेणे आवश्यक आहे. या मुद्दांचा अभ्यास केला तरच कुळ हक्काबाबत जास्त माहिती शेतकरीवर्गाला होणार आहे- १) सन १९३९च्या कूळ कायद्यातील दिनांक ०१/०१/१९३९ पूर्वी सतत ६ वर्ष कूळ म्हणून जमीन कसणाऱ्या व्यक्तीला किंवा दिनांक ०१/०१/१९४५ पूर्वी सतत ६ वर्ष जमीन कसणारा आणि दिनांक ०१/११/१९४७ रोजी जमीन कसणारा कूळ या सर्वाची नोंद नोंदणीपत्रकात संरक्षीत कूळ म्हणून केली गेली. २) सन १९५५ साली कुळ कायद्यात थोडी सुधारणा करण्यात आली, ही सुधारणा करण्यापूर्वी वहिवाटीमुळे, रुढीमुळे किंवा कोर्टाच्या निकालामुळे ज्या व्यक्तींना कायम कुळ म्हणून संबोधण्यात आले व ज्यांची नोंदणी हक्कनोंदणी पत्रकात कायम कुळ म्हणून नोंद केली गेली, त्या सर्वाना कायम कुळ असे म्हटले जाते. कुळाचे प्रकारः कुळ ही संकल्पना फारच विस्तृत आहे. सर्वसाधारण इतरांची जमीन विशेष करार करून अंगमेहनत करून कसणारा इसम हा कुळ असल्याचे मानले जाते, असे असले तरी कायद्यान्वये कुळ यामध्ये तीन प्रकारात विभागणी करण्यात आलेली आहे. या विभागणी वरूनच कुळाचा दर्जा ठरविण्यात आलेला आहे- १. दिनांक ०१/०१/१९४७ जमीन कसणारा संरक्षित कुळ मानण्यात आले आहे. २. सन १९५६मध्ये कुळकाद्यात सुधारणा झाल्यामूळे दिनांक ०१/०१/१९४७ नंतरच्या ते १९५६पर्यंतच्या जमिन कसणाऱ्या व्यक्तींना कायम कुळ मानण्यात आले आहे. ३. सन १९५६नंतर ते आज निकाल दिलेल्या कुळांना साधे कुळ समजण्यात येते. वरील तिन्ही प्रकारात दुसऱ्याच्या मालकीची जमिन कसणे अभिप्रेत आहे. कुळ नियम लागू होत नाहीत अशा जमिनी कुळ कायद्याची व्याप्ती पाहता, ती प्रामुख्याने मोठी आहे. परंतू समाजातील काही वर्ग असा असतो की, ज्या वर्गाला आपल्या मालकिची शेतजमिन करण्याइतपत शक्ती नसते किंवा शक्ती असली तरी परिस्थितीमुळे शेतजमिन जातीने कसणे शक्य होत नाही. तेव्हा उदरनिर्वाह करण्यासाठी अशा व्यक्ती इतर व्यक्तींना शेती करण्यासाठी देतात. अशा जमिनीवरही कुळ कायदा लागू झाला तर अशा व्यक्तींचा उदर निर्वाह करणे कठीण होवून जाईल. या बाबींचा विचार करून कुळ नियमाला अपवाद म्हणून खालील घटकांच्या जमीनीवर कुळ कायदा लागू होत नाही, हे समजून घेतले पाहिजे- १) विधवा, २) अवयस्क व्यक्ती म्हणजेच कायद्याने वयस्कर नसलेली व्यक्ती, ३) शरीराने दुर्बल असलेली व्यक्ती, ४) मनाने दुर्बल असलेली व्यक्ती, ५) सैन्य दलात काम करणारी व्यक्ती. या पाचही व्यक्तींच्या जमिनीला कुळकायदा लागू होत नाही. परंतु या ठिकाणी क्रमांक १ मधील व्यक्तीच्या जमिनीला कुळ लागल्याची उदाहरणे आहेत. याबाबत संबंधीत परिस्थितीतीचा विचार केला आहे. त्यानुसार सदर व्यक्तीची जमीन कुळ कायद्यान्वये येत असल्यास, त्या जमिनीला कुळकायदा लागू होतो. बाकी अन्य क्र २ ते ५ पर्यंतच्या मालकीच्या जमिनीला कुळ कायदा लागू होत नाही. त्याचप्रमाणे सदर जमिनीवर पीक पाहाणीच्या वेळी खुद्द लिहून त्या व्यक्तींचे हक्क शाबूत ठेवण्यात आलेले आहेत. जमीन कसणाऱ्या व्यक्तीला त्याचा हक्क मिळावा म्हणून मुंबई राज्यात कसेल त्याची जमीन या धरतीवर कुळकायद्याची निर्मीती करून दि.२८ डिसेंबर १९४८ रोजी तो लागू करण्यात आला. त्यामुळे कुळांना जमिनी मिळाल्या परंतू अशा जमिनी त्यांच्या ताब्यात कायम राहाव्यात यासाठी कुळकायद्यान्वये कुळजमीन विक्रीला बंदी घातली आहे. सदर बंदी असलेला शेरा त्यांच्या ७/१२ वर इतर हक्कात नोंदविला जातो. त्यामुळे अशा जमिनीची विक्री होत नाही. त्यामूळे कुळ हे भूमिहीन होण्याची भिती राहत नाही. परंतु आधुनिकतेचा प्रसार पाहता शहरीकरणामध्ये वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे विविध अडचणीमुळे कुळ कायदा कलम ४३ अन्वये पात्र असणाऱ्या जमिनी काही नियमांचे पालन करून विक्रीची परवानगी मिळते.

मूळतः कुळकायद्यान्वये शेतीवर अवलंबुन असणाऱ्या व्यक्तींच्या हक्काचे रक्षण व्हावे, त्यांना कुळ हक्काने मिळालेल्या जमिनी समाजातील वर्गाकडून खरेदी होवून कुळ भूमिहिन होवू नये व त्यांच्या उदरनिर्वाहाची समस्या उद्भवू नये, यासाठी सदर जमीन विक्रीकरीता बंदी घालण्यात आलेली आहे. कुळकायदा कलम ४३ अन्वये असणाऱ्या अटी समजून घेतल्यास कुळ जमनी खरेदीविक्री बाबत सामान्य व्यक्तींचे मतप्रवाह व गैरसमज निश्चित दूर होतील. या कलमान्वये जर कुळाला मिळालेली जमिन विक्री करावयाची असेल तर संबंधीत कुळाच्या ७/१२ वर कुळकायदा कमल ४३ ला पात्र असा शेरा असणे आवश्यक आहे. त्यानुसारच पुढील अटी शर्तीच्या आधारावर जमिन विक्री करता येते. १. जर कुळांना आपली जमीन विकायची असेल तर त्यांना सक्षम अधिकाऱ्याची परवानगी घेणे आवश्यक असते. उदा. तहसलिदार. २. सदर जमिन बिगर शेती प्रयोजनासाठी विकता येते. ३. कुळ जमिन धर्मदाय संस्थाना विकता येते. ४. कुळ जमीन शैक्षणिक संस्थेच्या इमारतीसाठी किंवा शैक्षणिक संस्थेच्या इतर प्रयोजनासाठी विकता येते. ५. कुळ जमिन सहकारी संस्थेला विकता येते. ६. कुळ जमीन जर इतर शेतकऱ्याला विकायची असेल तर ती खालील परिस्थिती निर्माण झाल्यास विकता येईल- कुळ हा कायमचा शेती व्यवसाय सोडून देणार असल्यास, कुळ हा जमिन कसण्यास असमर्थ ठरला असेल तर, अशी परिस्थिती निर्माण झाली तरच कुळ जमीन इतर दुसऱ्या शेतकऱ्याला विकता येईल. कुळ जमीन खरेदी व्यवहार कुळ कायद्यातील कलम ४३ ला पात्र असल्यास काही अटींचे नियम पालन करावे लागते. याचे कारण म्हणजे कुळांनी मिळालेली जमीन ही परस्पर विकू नये व त्यांची फसगत होवू नये, असा उद्देश ठेवण्यात आलेला आहे. जेव्हा कुळाला मिळालेले शेत विकायचेच असे निश्चित झाल्यावर अशा कुळाला शेती व्यवसाय सोडणार, तेव्हा कुळ हक्काची जमीन विकली जाते. अशी जमिन विकण्याची असते तेव्हा खरेदी विक्री करण्यापूर्वी खालील अटी निकष पाळले जातात- १. सर्व प्रथम अशा व्यवहाराला सक्षम अधिकाऱ्याची परवानगी आवश्यक असते. उदा. तहसिलदार. २. जमिन विक्री करण्यापूर्वी शासकीय कोषागारात नाममात्र रक्कम जमा करणे आवश्यक असते. अशी रक्कम ठरविताना ती जमीनीच्या आकाराच्या ४० पट एवढी असते. यालाच नजराणा रक्कम असे म्हणतात. वरील दोन्ही अटींच्या पूर्ततेवरुन असे निदर्शनास येते की, जेव्हा सार्वजनिक कामासाठी किंवा प्रयोजनासाठी व विविध संस्थाना कुळ जमन खरेदी करावयाची असते, त्यावेळी सार्वजनिक हिताचा विचार करता कुळ जमिनीचा व्यवहार करताना फारशा अटी शर्ती नाहीत. परंतु जेव्हा कुळ जमीन ही व्यक्तीस किंवा दुसऱ्या जमीन मालकाला घ्यावयाची असते तेव्हा असा कुळ जमीन धारक हा काही पैशांच्या अमिषाने जमीन परस्पर विकून मोकळा होवू नये, यासाठी कुळांना आपण शेती व्यवसाय सोडून देत आहे किंवा आता कुळाकडून शेती होणे शक्य नाही. कुळ शेती करण्यासाठी असमर्थ आहे. अशाच वेळी कुळाला जमीन ही दुसऱ्या जमीनमालकाला विकता येते. म्हणजेच कुळ जेव्हा संस्थाना किंवा सार्वजकिन प्रयोजनासाठी आपली जमीन विकत असेल तेव्हा तो शेती व्यवसायिक असतो. परंतु जेव्हा इतर व्यक्तीला जमीन देतेवेळी कुळाला आपण शेती व्यवसाय करणार नाही. तो कायमचा सोडून देत आहोत. असे प्रमाणित करावे लागते, तेव्हाच अशा जमिनीचा व्यवहार होवू शकतो. कुळ जमीनी या मिळालेल्या असल्यामुळे त्यांची खरेदी विक्री करून नफा कमविणे, असा व्यापारी उद्देश न ठेवता कुळ जमीन ही उदरनिर्वाहाचे साधन आहे. हा दृष्टीकोन असावा. व्यापारी उद्देश न ठेवता कुळ जमीन ही उदरनिर्वाहाचे साधान आहे. हा दृष्टीकोन राहावा, यासाठी कुळ जमिनीची खरेदी विक्री दरम्यान, शासकीय कोषागारात जमीनीच्या आकाराच्या ४० पट एवढी नजराणा स्वरुपात रक्कम भरावी लागते. सदर जमीन ही अतिरिक्त होवून व कसे त्याची जमीन हे तत्व ठेवून कुळाला मिळालेली असली तरी जमीनीला शासनाचे संरक्षण आहे, प्रत्येक शेतकऱ्यांनी, भूधारकाने लक्षात ठेवले पाहिजे. तसेच ही प्राथमिक माहिती कुळ कायद्याबद्दल उपलब्ध केलेली असून अधिक माहितीसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे. सदर कायदा लाभदायक ठरावा,

# ख्यातनाम शिल्पकार महेंद्र थोपटे यांना पुणे अचिव्हर्स 2023 चा सन्मान

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे हस्ते पुरस्कार पुणे येथे बहाल; मार्तंड विजय शिल्प सृष्टी प्रकल्प जेजुरी येथे उभारणार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** देशभरातून भारतीय महापुरुष क्रांतिकारांच्या ऐतिहासिक प्रतिमा साकरणारे प्रसिद्ध शिल्पकार महेंद्र थोपटें यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने पुणे येथे राज्याचे उपराज्यमंत्री अजितदादा पवार यांचे हस्ते त्यांच्या कला शास्त्रातील योगदाना बद्दल पुणे अचिव्हर्स 2023चा पुरस्कार प्रदान करण्यात आला याप्रसंगी महिला आयोग प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर आमदार विलास लांडे, पिंप्रीचिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिहं, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे पत्रकार नितीन शिंदे राहुल तांबुळे आदी मान्यवर उपस्तिथ होते गेली वीस वर्ष सातत्याने आपल्या कला संस्कार कला दालनाच्या माध्यमातून ते शिल्पकला क्षेत्रात आपला नाव लौवकिक टिकवून असून देशभरातून विविधराज्यात विविध महापुरुषांच्या उंच प्रतिमा बनविन्यात त्यांचा हातखंड मानला जातो नुकताच महाराष्ट्र राज्यातील सर्वात उंच असा पंचवीस फुटाचा शिव छत्रपती पुतळा साकारला असून येत्या 19फेब्रुवारीला कोकणातील रोहा येथे स्थापन करण्यात येणार आहे राजदंडा धीस्टीत अनोखा शिव पुतळा शिवाजी शहाजी पिता पुत्र भेट शिल्प असे विविध शिल्पसृष्टी प्रकल्प ही त्यांनी साकारले आहेत अनेक पुरुसकारांचा सन्मानही महेंद्र थोपटें यांना मिळालेले आहेत राज्यातील पहिला अत्याधुनिक मार्तंड विजय शिल्प सृष्टी प्रकल्प जयाद्री खोऱ्यात जेजुरी येथे उभारणार असल्याचे त्यांनी सांगितले.



# खुली अभ्यासिका तयार करणार : आ. किशोर जोरगेवार

## वडगाव येथील अभ्यासिकेच्या इमारतीचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विद्यार्थी प्रतिभाशाली आहे. प्रत्येक क्षेत्रात त्याने भरारी घेतली आहे. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयी सुविधा देण्याचा आमचा मानस आहे. आपण मतदार संघात ११ अभ्यासिका तयार करत आहोत. यातील आज दुस-या अभ्यासिकेच्या इमारतीचे लोकार्पण झाले आहे. अभ्यासा बरोबरच त्यांना विचारांची देवाण - घेवाण करता यावी, आपले अनुभव दुस-या विद्यार्थ्यांपर्यत्न पोहचविता यावेत. अभ्यासासाठी पूरक असे उत्तम वातावरण निर्माण व्हावे यासाठी आपण चंद्रपूरात ५० लक्ष रुपयातून खुली अभ्यासिका तयार करणार असुन हा चंद्रपूरातील पहिला प्रयोग असणार आहे. असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

आमदार निधीतून वडगाव येथील नानाजी नगर येथे अभ्यासिकीचे इमारत बांधकाम करण्यात आले आहे. आज सदर ईमारतीचे आमदार किशोर जोरगेवर यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माजी नगर सेवक पप्पू देशमूख यांची तर प्रमुख अतिथी म्हणून नवदत्त क्रीडा मंडळाचे अध्यक्ष हरिचंद्र येरगुडे, विनोद निखाडे, जनविकास युवा आघाडीचे अक्षय येरगुडे, जनविकास महिला आघाडी प्रमुख मनीषा बोबडे, सार्वजनिक दत्त मंदिराचे सचिव व्यंकटेश उपगन्लावार, बाळू पारखी, मनोज भैसारे आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना ते पूढे म्हणाले की, केलेल्या संकल्पाची पुर्तता होते. तो आनंद मोठा असतो. आमदार होताच चंद्रपूर मतदार संघात गरिब - गरजु विद्यार्थ्यांना निशुल्क अभ्यास करता यावा याकरिता 11 अभ्यासिका तयार करण्याचा संकल्प केला होता. तो पूर्ण होउ लागला आहे. आज आपण मतदार संघातील दुस-या अभ्यासिकेच्या इमारतीचे लोकार्पण करत आहोत. ही दत्त मंदिर येथील लोकार्पीत झालेली अभ्यासिकेची ईमारत शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात नक्कीच योगदान देणारी ठरेल असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. जोरगेवार म्हणाले कि, चंद्रपूर मतदार संघाचा विकास होत आहे. हा विकास होत असताना समाजातील सर्व घटकांना स्पर्श करण्याचा आमचा प्रयत्न राहिला आहे.



**किशोर जोरगेवार हे समाज उपयोगी सुचनांची तात्काळ दखल घेणारे आमदार – पप्पू देशमूख**

आमदार किशोर जोरगेवार हे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमी तत्पर असतात . त्यांना एखादी मागणी केली व ती लोकउपयोगी असली कि ते ती पूर्ण करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करतात . आज येथे लोकार्पित झालेली अभ्यासिका याचाच प्रत्यय देणारी आहे . आपण त्यांना खुल्या अभ्यासिकेची मागणी केली ती ही समजून घेत त्यांनी यासाठी ५० लक्ष रुपयांच्या निधीची घोषणा केली आहे . एकंदरीतच किशोर जोरगेवार हे समाज उपयोगी सुचनांची तात्काळ दखल घेणारे कार्यक्षम आमदार असल्याचे यावेळी माजी नगरसेवक पप्पू देशमूख म्हणाले .

मतदारसंघातील ग्रामीण भागात आपण विकास पोहचवू शकलो आहे. महाविकास आघाडी सरकार आणि आता शिंदे- फडणविस सकरकार या दोनही काळात आपण विविध विभागातून मोठा निधी खेचून आणला आहे. या निधीतून विकासकामे करत असतांना मोठ्या इमारती, बगीचे बांधण्यावर आपण भर न देता लोकउपयोगी वास्तु उभारण्यावर लक्ष केंद्रीत केले. समाजाचे प्रबोधन व्हावे यासाठी आपण सामाजिक भवन उभारले आहे. हे सामाजिक भवन भविष्यात सांस्कृतीक, सामाजिक, धार्मिक कार्यक्रमासाठी उपलब्ध असणार आहे. तर कोरोणा काळात विद्यार्थ्यांवर कोसळलेल्या संकटात आपण विद्यार्थ्यांसाठी मतदार संघात 11 अभ्यासिका तयार करण्याचा संकल्प केला होता. यासाठी मोठ्या निधीची गरज होती. ती पूर्ण करतांना अनेक अडचणी आल्यात मात्र केलेला संकल्प पुर्ण करण्याचा निर्धार आपण केला होता. याचेच परिणाम स्वरुप आज आपण मतदार संघातील दुस-या अभ्यासिकेच्या ईमारतीचे लोकार्पण करत असल्याचे ते यावेळी म्हणाले. आज इमारतीचे लोकार्पण झाले आहे. येथे पुस्तक व ईतर साहित्य खरेदीसाठी आपण आणखी निधी देणार असल्याचेही ते यावेळी बोलताना ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन संचालन रमा देशमुख यांनी केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी व स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराच्या जयघोषात बाळापूर उपनगरमध्ये दत्त जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दिगंबरा दिगबंरा श्रीपाद वल्लभ दिगबंरा'च्या गजरामध्ये धुळे तालुक्यातील बाळापुर उपनगर या ठिकाणी श्री दत्त जयंती उत्साहात पार पडली आहे.यावेळी दत्त मंदीर याठिकाणी भाविकांची दर्शनासाठी अलोट गर्दी दिसून आली. दिवसभरात दत्त जयंतीनिमित्त मंदिरामध्ये सकाळी होमहवन, गुरुचरित्र सामूहिक पारायण व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले; याचबरोबर विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सायंकाळच्या सुमारास वाद्यांच्या व टाळ-मृदुंगाचा गजर करत संपूर्ण भक्तिभावानं श्री दत्तांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी ग्यानबा तुकाराम माऊली टाळ-मृदुंगाचा गजर आणि कीर्तनाचे सुमधूर स्वर कानांना तृप्त करत होते. श्री दत्तगुरूंच्या पालखी मिरवणुकीला भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. रात्री कीर्तनाचे आयोजन ही आयोजकांच्या वतीने करण्यात आले होते..

# सा. दुय्यम निबंधक कार्यालयात बोगस रजिस्ट्री केल्याबद्दल तहसिलदारांना निवेदन


आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील अंगलगाव तेथील रहवाशी दिलीप रामासा बांडे हे असुन त्यांच्या नावाने वडिलोपार्जित असलेली शेती गट क्रमांक 85 असून ति जमीन दिलीप रामासा बांडे यांच्या मालकी हककांची जमीन क्षेत्रफळ .३ हेक्टर 70 आर जमीन त्याचे सातबारा ला नोंद होती परंतु काही वर्षा नंतर सदर जमीनीचे खरेदीखत दस्त क्रमांक 2036.2009 दिंनाक एकोणीस सहा २००९ ला विक्री क्षेत्रफळ 00 आर हेक्टर 80 आर अशे दोन खरेदीखत केले आहे सदर खरेदीखत हे आनंत रामासा बांडे रा सूरत हा मु सहजानंद सोसायटी रिंग रोड सुरत या परीसरातील रहिवाशी असून त्यांनी सदर खरेदीखत चूकीने व गैर पणे मंतीमंद व्यक्ती कडून दिशाभूल करून तसेच खोटे साक्षीदार ठेऊन खरेदीखत करून घेतले आहे साक्षिदार चे नाव पांडुरंग बळीराम घूगे व त्याची पत्नी ईद्राबाई पांडूरंग घूगे हे दोन सदर खरेदीखत मदधे साक्षीदार असून खोटी साक्ष देऊन आंनत रामासा बांडे यांना संगणमत करून मंतीमंद दिलीप रामासा बांडे यांची जमीन आनंत रामासा बांडे यांच्या नावाने केली असून रामासा बांडे यांनी सदर जमीन गट क्रमांक 85 येथील तिन्ही मूलाला सारखेच वाटणी पत्र करून दिले होते परंतु आनंत रामासा बांडे यांनी स्वताः च्या मालकी हककांची शेत जमीन तीन हेक्टर सतर आर पांडूरंग बळीराम याना अगोदरच विक्री केली नंतर दिलीप रामासा बांडे यांची जमीन जिंतुर येथील दुय्यम निबंधक कार्यालय रजिस्ट्री ओफीस येथे खोटे साक्ष पुरावे लाऊन मंतीमंद दिलीप रामासा बांडे यांना दोन लाख चाळीस हजार रूपये दोन हेक्टर सतर आर एवढया जमीनीचे खरेदीखत करून बोगस रित्या खोटे साक्ष ठेऊन जमीन आनंत रामासा बांडे यांनी स्वताः च्या नावे केली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे .दिलीप रामासा बांडे यांना मोठा भाऊ सुभाष रामासा बांडे यांना न विचारपुस करता बोगस रजिस्ट्री करून जमीन हडपली असून सदर जमीन मंतीमंद दिलीप रामासा बांडे यांच्या नावे असावी कारण भारतीय संवैधानिक नियमानुसार मंतीमंद यांची जमीन फसवून घेतल्या मुळे हा एक भ्रष्टाचार असून आनंत रामासा बांडे व खोटी साक्षीदार यांना लवकरात लवकर अटक करून तहसीलदार जिंतूर व पोलीस अधिकारी जिल्हा परभणी पोलीस ठाणे बामणी अश्या प्रकारे शासकीय यंत्रणेने लवकरात लवकर दिलीप रामासा बांडे यांच्या जमीनीची चौकशी करून दिलीप बांडे मंतीमंद असून यांना न्याय तहसिलदार साहेब यांनी दयावा निवेदनाच्या प्रति ग्रामीण पोलीस ठाणे बामनी, जिंतुर शहर पोलीस ठाणे,व जिल्हा अधिकारी परभणी यांना दिल्याचे म्हटले आहे.




# रिपब्लिकन हक्क परिषदेचे पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज







**नांदेड :** भीमा कोरेगाव शौर्य दिन 206 व संघटनेचा विसावा वर्धापन दिनाचे औचित्य साधून रिपब्लिकन हक्क परिषदेच्या वतीने यावर्षीचे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. भदंत महावीर थेरो, प्रा. डॉ. भास्कर दवणे, किरण गायकवाड, पत्रकार अनुराग पोवळे, डॉ. गजानन ढोले आदी मान्यवरांना येत्या सोमवारी दिनांक 1 जानेवारी 2024 रोजी शौर्य दिनी विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती रिपब्लिकन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष रमेश रामजी सोनाळे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली आहे.

पत्रकारांशी वार्तालाप करताना रमेश सोनाळे पुढे म्हणाले की, दबलेल्या, पिचलेल्या, शोषित समाजाच्या उत्थानाचा इतिहास रचणाऱ्या भीमा कोरेगावच्या लढाईतील दैदिप्यमान विजयाचा वर्धापन दिन, रिपब्लिकन हक्क परिषद नांदेडच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी येत्या सोमवारी दिनांक 1 जानेवारी 2024 रोजी सकाळी १० : ०० वाजता आयटीआय चौक, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यासमोर साजरा करण्यात येणार आहे.

यावेळी शौर्य स्तंभास मानवंदना (सलामी) देण्याचा कार्यक्रम आणि रिपब्लिकन पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. त्यानुसार बौद्ध धम्माचे गाढे अभ्यासक भदंत महाविरो थेरो यांना धम्म रत्न 2023, शास्त्रज्ञ प्रा. डॉ. भास्कर दवणे यांना रिपब्लिकन रत्न 2023, किरण गायकवाड यांना सरसेनापती वीर सिद्धनाथ महार उत्कृष्ट शौर्य पुरस्कार 2023, पत्रकार अनुराग पोवळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार 2023, डॉ. गजानन ढोले यांना रिपब्लिकन विशेष सन्मान पुरस्कार 2023 या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच प्रभू सावंत सर, सुरेश हटकर, संजय कौठेकर , राहुल वाघमारे, सत्यपाल नरवाडे यांना रिपब्लिकन मित्र 2023 या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. अशी माहिती रिपब्लिकन हक्क परिषदेचे अध्यक्ष रमेश रामजी सोनाळे यांनी यावेळी दिली आहे. भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त आयोजित मानवंदना (सलामी) कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून सरसेनापती वीर सिद्धनाथ महार यांचे बारावे वंशज मिलिंद इनामदार उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भदंत पंय्याबोधी थेरो तर मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ) यांची उपस्थित राहणार आहे. विशेष अतिथी श्रीकृष्ण कोकाटे (पोलीस अधीक्षक) नांदेड, तर प्रमुख अतिथी आ. मोहनरावजी हंबर्डे व आ. बालाजीराव कल्याणकर, मिलिंद लोनपांडे (अमरावती) सुनील निकाळजे तसेच अतिथी श्रीकांत गायकवाड, दुष्यंत सोनाळे, अ. रऊफ , अ. गफुर, एस.एम. गोडबोले, सुखदेव चिखलीकर,विक्की वाघमारे, यांचीही यावेळी उपस्थिती राहणार असल्याची माहिती सोनाळे यांनी यावेळी दिली आहे.



# श्री दत्त जयंतीनिमित्त रामायणाचार्य अनंत महाराज वहाडणे यांचे कीर्तन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भगवान श्री दत्तात्रय महाराज जयंती निमित्त व निष्काम कर्मयोगी जगद्गुरू राष्ट्रसंत जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांच्या पुण्य स्मरण निमित्त मंगळवार(ता.२६)रोजी येथील श्री दत्तगिरी आश्रमात रामायणाचार्या अनंत महाराज वहाडणे( धारणगाव) यांचे सुश्राव्य काल्याचे कीर्तन झाले. भक्त भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. या प्रसंगी माजी खासदार चंद्रकांत खैरे, विद्यमान आमदार प्रा,रमेश पा.बोरनारे, माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी,विशाल संचेती, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र साळुंके,सचिन उर्फ बापू वाणी, शहर अध्यक्ष पारस घाटे, प्रकाश चव्हाण, भरत कदम, प्रशांत शिंदे, रमेश हडोळे यांची उपस्थिती होती. आ.बोरनारे, माजी खा. खैर व डॉ. दिनेश परदेशी यांची समयोचित भाषणे झाली. आ. बोरनारे यांनी धार्मिक कार्यक्रमासाठी आपल्या निधीतून ३०लक्ष रुपये उपलब्ध करून दिल्या बद्धल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला,आश्रमात पेवर ब्लॉक बसवून देण्याचे त्यांनी व डॉ. परदेशी यांनी मान्य केले. सूत्र संचलन व आभार प्रदर्शन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. याप्रसंगी प.पू. दत्तगिरी महाराज नांदगाव आश्रमचे हभप गुलाबगिरी महाराज, हभप बाळकृष्ण महाराज, हभप जगताप महाराज, हभप चन्ने महाराज, हभप ज्ञानानंदगिरी महाराज, नगराध्यक्ष शिल्पा ताई परदेशी, यांच्या शिवाय जनार्दन भक्तगण पुतळे पाटील, मोटे पाटील, अरविंद साळुंके, संतोष साळुंके, भिका नाईकवाडी, भाऊलाल सोमासे, दाणे पाटील व भक्त परिवार मोठ्या संख्येने उपस्थीत होते. या निमित्ताने नियमित कार्यक्रम जपानुष्ठान, आरती, गुरू चरित्र पारायण करण्यात आले.

# लायन्स क्लब, जन कल्याण सामाजिक संस्थेच्या नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** ग्राम पंचायत वेश्वी,तालुका उरण येथे जन कल्याण सामाजिक संस्था व लायन्स क्लब पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन प्रा. राजेंद्र मढवी उपाध्यक्ष उरण सामाजिक संस्था व सुनील तांबोळी सरपंच वेश्वि ग्राम पंचायत यांच्या हस्ते करण्यात आले. सुधाकर पाटील अध्यक्ष उरण सामाजिक संस्था व संतोष पवार सरचिटणीस उरण सामाजिक संस्था हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. लायन्स क्लब पनवेल यांच्या वतीने श्री.चव्हाण, गिल्डा, ॲड मनोज म्हात्रे आणि नायर नेत्र रुग्णालयाची टीम यांनी खूप मेहनत घेतली. या नेत्र चिकित्सा शिबिरात सर्वात जास्त म्हणजे जवळ जवळ ३०० लोकांच्या डोळ्यांची तपासणी झाली. त्यात रेकॉर्ड ब्रेक ६४ लोकांची मोतीबिंदू शस्त्र क्रियेसाठी पात्र ठरले. आज पर्यंत झालेल्या कॅम्प मध्ये आजचा कॅम्प हा सर्व च रेकॉर्ड ब्रेक करणारा ठरला. सरपंच सुनील तांबोळी यांनी त्यांच्या तर्फे सर्वांना मोफत चष्मा देण्याचे घोषित केले. जन कल्याण सामाजिक संस्थेच्या सर्व पदाधिकारी राजेंद्र पाटील , मदन पाटील , अच्युत कडू , संदीप मुंबईकर, विजय पाटील, शरद पालकर यांचे योगदान विशेष महत्त्वाचे ठरले. सर्वांनी मनापासून मेहनत घेतली म्हणून हे आयोजन यशस्वी झाले. संध्याकाळ झाल्यामुळे कॅम्प थांबवण्यात आला आणि दोन दिवसांनी आदिवासी वाडी साठी पुन्हा कॅम्प चे आयोजन करण्याचे ठरले आहे.



# भीम बुद्ध सिल्व्हर समितीतर्फे पौर्णिमेनिमित्त खीर वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भिम बुद्ध सिल्वर सेवाभावी संस्था धुळे तर्फे महामाया शुद्धोधन कॉलनी जलगांगा सोसायटी येथे मार्गशीषपौर्णिमा (गुरू दत जयंती) साजरी करण्यात आली व खीरदान कार्यक्रम संपन्न झाला. तथागत भगवान गौतम बुद्ध भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पुष्प अर्पण करून,दीप प्रज्वलन करण्यात आला बुद्ध वंदना घेऊन खिर वाटप करण्यात आले या ठिकाणी राधिकाताई राहुल खरात यांच्या हस्ते सुरुवात करण्यात आली कार्यक्रमात उपस्थित मान्यवर भीम बुद्ध सिल्वर सेवाभावी संस्था अध्यक्ष रेखा राजेंद्र पवार,अर्जुन राजेंद्र पवार सचिव, रविंद्र सरदार,नितीन झमडाले,दादू चव्हाण,अनिता देवरे,पुनम पारधी,विमल बेडसे,शेला केदार,आम्रपाली पवार राजुबाबा पवार अधी उपस्थित होते.





# कृषी व ग्रामीण विकास संस्थेचा २४ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कटिबद्ध : गणेश बनकर

आधुनिक केसरी न्यूज

**राजरत्न भोजने**

**अंबेलोहळ :** कृषी व ग्रामीण विकास प्रतिष्ठान अंबेलोहळ या संस्थेचा २४ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त यावेळी संस्थेचे कार्यकारी संचालक गणेश बनकर पाटील उपस्थित होते. कृषी व ग्रामीण विकास प्रतिष्ठान विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत असे प्रतिपादन केले.तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी विद्यार्थ्यांना मदत करून मोफत प्रशिक्षण देण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. असे गणेश बनकर संस्थेच्या वर्धापन सोहळ्यात बोलत होते. राजे शहाजी कनिष्ठ महाविद्यालय व राजे शहाजी वरिष्ठ महाविद्यालय,एव्हरग्रीन इंग्लिश स्कूल व एस बी पब्लिक स्कूलमध्ये विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. विजयी स्पर्धकांना व संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी दादा बनकर पाटील यांनी संस्थेने मागील चोवीस वर्षात केलेल्या सामाजिक आर्थिक व शैक्षणिक व राजकीय कार्यास उजाळा दिला तसेच भविष्यात जलसंधारण सामुदायिक विवाह सोहळा विविध व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करणार असल्याचेही ते म्हणाले. या प्रसंगी संस्थेचे तज्ञ संचालक उद्धव शिरसाठ, ह.भ.प.मेटे महाराज,बबनराव कर्डिले यांची भाषणे झाली या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# शालेय जीवनात वार्षिक क्रीडा स्पर्धा घेणे गरजेचे; ॲसेंड स्कूलच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** शालेय जीवनात खेळ हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा व अविभाज्य घटक आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती असलेल्या 'आरोग्यम् धनसंपदा" या सुभाषितेचे महत्त्व आपल्या सर्वांना माहित आहे. निरोगी शरीरासाठी व्यायाम केले पाहिजे, खेळात सहभागी झाले पाहिजे. खेळामुळे शिस्त, परीश्रम संघभावना,नेतृत्व यांसारखे गुण वाढीस लागतात. हेच गुण विद्यार्थ्यांमध्ये येण्यासाठी शालेय जीवनात वार्षिक क्रीडा स्पर्धा घेणे गरजेचे असते. निरा पिंपरे ता. पुरंदर येथील ॲसेंड इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कबड्डी,खो-खो, क्रिकेट,धावणे यांसारख्या विविध खेळातून विद्यार्थ्यांनी सहभागी होत स्वतःचे कला कौशल्य दाखविले. यावेळी सर्वांकडूनच टाळ्यांची दाद सुद्धा मिळाली. या स्पर्धेप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून या वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उदघाटन प्रमुख पाहूणे सुषमा मदने,सचिन मदने,शाळेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे,सचिव नीता खोमणे,मुख्याध्यापिका सुषमा भुंजे यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलनाने करण्यात आले. अभ्यास आणि पुस्तके खेळांपेक्षा जास्त महत्वाची आहेत.असे अनेकांचे मत असेल.पण सत्य हे आहे की, अभ्यास आणि खेळ या दोघांना जीवनात तितकेच महत्त्व दिले पाहिजे.तसेच आनंदी जीवन जगण्यासाठी एक व्यक्ती मानसिक शारिरीक आणि भावनिक दृष्ट्या तंदुरूस्त असणे महत्वाचे असते, असे मार्गदर्शन प्रमुख पाहुणे सुषमा मदने



यांनी केले. तसेच मुख्याध्यापिका सुषमा भुंजे यांनी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुजाता जाधव यांनी केले.रुपाली शितोळे यांनी या क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले.तसेच स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



# आव्हान प्रशिक्षण शिबिरासाठी कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** तालुक्यातील सुविदे फाऊंडेशन अंतर्गत कृषी महाविद्यालयाचे चार विद्यार्थी आणि चार विद्यार्थ्यांनी व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.दीपक दत्ता मसुडकर हे आव्हान २०२३ या कार्यक्रमाअंतर्गत २५ डिसेंबर २०२३ ते ३जानेवारी २०२४ गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरासाठी रवाना झाले आहेत. डॉ. एस. एस. हाडोळे संचालक विद्यार्थी कल्याण विभाग व कार्यक्रम समन्वयक अधिकारी, डॉ. एम.जे. देशमुख यांच्या नियोजनातून आणि कृषी महाविद्यालय रिसोड येथील तांत्रिक समन्वयक आर.एस.डवरे, प्राचार्य डॉ.ए.एम. अप्तुरकर यांच्या मार्गदर्शनात कु. निकीता देशमुख, कु. सेहल बोडखे, कु. किरण जायभाये, कु. आकांक्षा सावके, गणेश डहाळके, हर्षल काळबांडे, यशवंत सावके, रोहन झाडे या विद्यार्थ्यांची निवड गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय आव्हान २०२३ साठी महामहीम राज्यपाल निर्मित राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरासाठी झाली आहे.

**सुविदे फाऊंडेशनकडून विध्यार्थ्यांना शुभेच्छा ..**
सुविदे फाऊंडेशन कृषि महाविद्यालय रिसोड चे अध्यक्ष मा . खा . तथा माजी मंत्री अनंतरावजी देशमुख यांनी प्रशिक्षणार्थी विध्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत .तद्वतच, कृषि महाविद्यालयाचे विशेष तांत्रीक समन्वयक, प्राचार्य, प्राध्यापक आणि कर्मचारी वृंद यांनी सुद्धा आव्हान २०२३ साठी रवाना झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत .

त्याअनुषंगाने रासेयो कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीकडे झाली शिबिरासाठी रवाना झाले आहेत. सतत १० दिवस चालणाऱ्या या शिबिरात थिअरी आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येणार आहे. आपत्ती म्हणजे काय? संकल्पना, प्रकार निवारण आणि राष्ट्रीय सेवा योजना युवा विद्यार्थ्यांना भूकंप, सुनामी, हिमस्खलन, दरड कोसळणे, कोसळलेल्या इमारत बचाव कार्य तंत्र, महापुर, आग आणि विज बचाव कार्य, रुग्ण हाताळणी, प्राथमिक उपचार, सर्पदंश प्रकरण उपाय, प्रतिबंध तसेच नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती पासुन स्वतः चे आणि इतरांचे प्राण वाचवून बचाव कार्य कसे करायचे आदी बाबत प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

सदर शिबिरात यतार्थ प्रशिक्षण राष्ट्रीय आपत्ती संरक्षण पथक एनडीआरएफ पुणे यांच्याकडून प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रशिक्षण शिबिराचा लाभ सहभागी विद्यार्थी, कार्यक्रम अधिकारी यांनी घेवून आपल्या जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन कक्ष समवेत जिल्ह्यात होणाऱ्या दुर्घटना आपत्ती मध्ये आपला सहभाग नोंदवून बचाव कार्य करावे हा या प्रशिक्षण शिबिरा मागचा स्तुत्य उद्देश आहे. त्याअनुषंगाने कृषि महाविद्यालय रिसोड येथील विद्यार्थि आव्हानं प्रशिक्षण शिबिरसाठी रवाना झाले आहेत.

# फुलंब्री ग्रामीण रुग्णालयात फळवाटप

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा वाढदिवस सोमवारी (दि. २५) 'संघर्ष दिन' म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्ताने पक्षाचे तालुकाध्यक्ष राजू प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली फुलंब्री शहरात विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले. तसेच शहरातील ग्रामीण रुग्णालयात फळवाटप तर मूकबधिर शाळेत भोजन देण्यात आले.
राजपूत, गणेश राऊत, संजय सरोदे, गौतम गंगावणे, योगेश राजपूत, मधुकर भिवसने, सुमित प्रधान, मनोज पाटील, प्रसन्ना औचरमल, सुषमेश प्रधान, सचिन पगारे, योगेश प्रधान, नीलेश प्रधान, अभंग भडगे, सचिन फटाकडे, विशाल गंगावणे, किरण गंगावणे, दिनेश खंडागळे, रोहित पवार, ओम पाटील, चंदू गाडेकर, आकाश सुभाष गंगावणे, रोहित खंडागळे आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी गंगाधर काटकर, जयपाल राजपूत, गणेश राऊत, संजय सरोदे, गौतम गंगावणे, योगेश राजपूत, मधुकर भिवसने, सुमित प्रधान, मनोज पाटील,



प्रसन्ना औचरमल, सुषमेश प्रधान, सचिन पगारे, योगेश प्रधान, नीलेश प्रधान, अभंग भडगे, सचिन फटाकडे, विशाल गंगावणे, किरण गंगावणे, दिनेश खंडागळे, रोहित पवार, ओम पाटील, चंदू गाडेकर, आकाश सुभाष गंगावणे, रोहित खंडागळे आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# पृथ्वीवरील सर्व सज्जनांच्या जीवनात शांती मिळू दे, ख्रिसमस निमित्ताने केली प्रार्थना

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथे पृथ्वीवरील सर्व सज्जनांच्या जीवनात शांती मिळू दे, अन्याय,अज्ञान,व दिन दुबळ्यांच्या जीवनात अन्याय,अज्ञान ,व दीन दुबळ्यांच्या जीवनातील अंधकार दूर होऊ दे,या पृथ्वीवरील सर्व दुर्दैवी घटना थांबू दे व सर्वांना सुबुद्धी दे अशी प्रार्थना सोमवार(ता,२५) रोजी येथील करुणा माता चर्च मध्ये ख्रिसमस निमित्त येथील फादर संजय ब्राह्मणे व फादर मायकल डिसुझा यांनी प्रभू येशू च्या चरणी केली,येथील सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत या समयी उपस्थित होते त्यांनी उपस्थित सर भक्त भाविकांना ख्रिसमस च्या शुभेच्छा दिल्या व जगात शांतता लाभावी म्हणून प्रभू येशूला साकडे टाकले, या प्रसंगी फादर प्रवीण जाधव(हैद्राबाद),सागर वाघ,कमल वाघ, संध्या वाघ व तालुक्यातील भक्त भाविक मोठया संख्येने उपस्थित होते,ख्रिसमस निमित्त येथील करुणा माता चर्च वर विद्युत रोषणाई करण्यात आलेली होती,पूर्व संध्येवर फादर संजय ब्राम्हणे यांनी प्रभू येशूच्या जीवन चरित्र वर उदबोधन केले.

# बिरसा मुंडा जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १४८ व्या जयंती निमित्त गुरुवारी (ता.२८) शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.जयंती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. कमलताई फोले (वाणिज्य विभाग प्रमुख, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर) तर उद्घाटक संतोष टारपे (माजी आमदार, कळमनुरी) यांची उपस्थिती राहणार आहे. जयंती सोहळ्याच्या नियोजन करण्यासाठी डॉ. उत्तम वागतकर यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी समाज बांधवांनी या जयंती सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जयंती मंडळाच्या वतीने करण्यात आले. जयंती सोहळ्याची सुरुवात येथील बिरसा मुंडा चौक मुदखेड रोड येथून मूळ आदिवासी पारंपारीक व सांस्कृतिक प्रदर्शन मिरवणुकीने होणार असून यातील मुख्य आकर्षण म्हणजे शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांचे लेझीम पथक, किनवट तालुक्यातील पारंपारिक मूळ आदिवासी ढेमसा नृत्य, आदिवासी दंडार नृत्य व महिलांचे सांस्कृतिक कलाप्रदर्शन असणार



आहे तसेच माऊली मंगल कार्यालयात आदिवासींच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा, मोफत आरोग्य तपासणी, शस्त्रक्रिया व भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जयंती सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन शिवाजीराव देवतुळे, माधव माजळकर (माजी सरपंच, समंदरवाडी), धोंडीबा भिसे (मा. संचालक, हनुमंत वागतकर ( वाहतूक नियंत्रक भोकर), संजय धनवे (कोषाध्यक्ष), शेषराव हुरदुके, आमदरी, मारुती वागतकर, रंगराव वागतकर, राजू बुरकुले , सौ. संध्याताई भुरके, श्रीमती अनुराधाताई मेंडके, सौ. सरस्वती भिसे, सौ. रुक्मीना पांडेवाड, सौ. प्रेमलता धनवे, सौ. भाग्यलक्ष्मी तायवाडे, श्रीमती सुनिता कोतवाल, सौ. शकुंतला वागतकर, सौ. सुमन डोखले, सौ. अंबिका वागतकर यांनी केले आहे.

# फुलंब्री ते चिंचोली रस्ता पंधरा दिवसात फुटला

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील फुलंब्री ते चिंचोली डांबरी रस्ता पंधरा दिवसात फुटला या रस्त्याची दुरवस्था झाली असून खडी रखडलेली ठिकाणी खड्डे त्यामुळे यात अपघात झाला असून एक महिला बेशुद्ध असते दवाखान्यात दाखल केले त्यामुळे प्रवासी वाहनधारकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे बातम्यांच्या माध्यमातून सतत मागणी केल्यामुळे ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाने सार्वजनिक विभागाचे हात मिळवणे करून बोगस काम केले विभागाने राष्ट्राचे थातुर्मतुर काम करून तो रस्ता पंधरा दिवसांमध्येच फुटला अनेक प्रवासी जीव मोठे धरून प्रवास करीत आहे त्यामध्येच एक अपघात झाला त्यामध्ये महिला बेशुद्ध झाली बेशुद्ध अवस्थेत त्या महिलांना दवाखान्यामध्ये दाखल केले असून या रस्त्याची सखोल चौकशी व्हावी असे राष्ट्रवादीचे योगेश पाटील जोगदंडे व नागरिक करीत आहे.



हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा तालुका अध्यक्षपदी माजी सभापती दिनेश अंभोरे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** माजी नगरसेवक परसराम बारगळ यांची



खुलताबाद शहराध्यक्षपदी तर अनुसुचित जमाती मोर्चा तालुकाध्यक्षपदी माजी सभापती दिनेश अंभोरे यांची निवड करण्यात आली. भाजपा तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे यांनी नियुक्तीपत्र परसराम बारगळ व दिनेश अंभोरे यांना दिले. परसराम बारगळ हे आमदार प्रशांत बंब यांचे खंदे समर्थक तर दिनेश अंभोरे हे आमदार बंब यांचे विश्वास म्हणून त्यांची ओळख आहे. बारगळ यांना २०१६ नगर परिषद निवडणुकीमध्ये आमदार बंब यांनी
नगरसेवक पदाची उमेदवारी दिली व ते प्रचंड मताधिक्याने निवडून आले होते. दिनेश अंभोरे यांनी पंचायत समितीचे सभापती व उपसभापती पद भूषविलेले आहे निवडीबद्दल केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड, आमदार प्रशांत बंब, जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, जिल्हा सरचिटणीस एल. जी गायकवाड, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे आदींनी निवडीचे स्वागत केले.

# आबांच्या मिसेस अर्चना पाटील यांच्याशी संवाद म्हणाल्या, आबा सतत जनतेचे काम करत असतात

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आमदारकीचा चौकार मारतील आ.मकरंद पाटील; जनतेचा विषय हाच विजयाचा बॅनर, आ.मकरंद पाटील यांना पराभूत करणं सोपं नाही; आबांचा जनसंपर्क होम टू होम या मथळ्याखाली वाई-खंडाळा-महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मकरंद (आबा) पाटील यांच्यावर आधारित दैनिक आधुनिक केसरीच्या माध्यमातून लेखन करण्यात आले होते. हे लेखन आबांच्या मिसेस अर्चना पाटील यांना खूप भावलं.आबांच्या बद्दल लिहिण्यात आलेलं लेखन १०० टक्के खरं आहे.अगदी वस्तुस्थिती मांडलेली आहे.आबा हे वाई महाबळेश्वर खंडाळा या तिन्ही तालुक्यात कसे तळमळीने काम करत असतात. हे आबांची पत्नी म्हणून मला माहित आहे.असे अर्चना पाटील यांनी म्हटले.

आबांवर करण्यात आलेले लेखन हे आबांच्या मिसेस अर्चना पाटील यांना वाचण्यास मिळाल्या नंतर त्यांनी या लेखनाबद्दल फोनद्वारे आवर्जून संवाद साधला. लेखनातील मांडणी खरच चांगली आहे. लिहिलेलं सगळं व्यवस्थित आहे.अगदी आत्मियतेने या लेखनाबद्दल कौतुक तर केलेच शिवाय लेखनातून आबांच्या कार्याची खरी वस्तुस्थिती मांडली आहे. अशा भावना सुद्धा अर्चना पाटील यांनी व्यक्त केल्या. लेखनाच्या अनुषंगाने अर्चना पाटील यांच्याशी संवाद घडून आला.अन वाई खंडाळा महाबळेश्वर या मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी असलेले आमदार म्हणून आबा हे कसे आहेत. हे आबांच्या मिसेस यांच्याकडूनच जाणून घेता आले.तसेही लोकप्रतिनिधी होणं हे सोपं नसतं. जनतेची कामे करत असताना स्वतःच्या कुंटुंबाकडे ही दुर्लक्ष होतच असते. आबा स्वतःच्या कुटूंबासाठी किती वेळ देतात आणि समाजासाठी किती वेळ देतात. यावर सुद्धा अर्चना पाटील भावुक होऊन व्यक्त झाल्या. आबांचा कुटूंबासाठी किती वेळ? असा प्रश्न उपस्थित राहताच क्षणी यावर अर्चना पाटील म्हणाल्या ते तर सोडुनच द्या. आम्ही समाजालाच आबा दिलेले आहेत, असे अगदी अभिमानाने त्यांनी सांगितले. कुटुंबासाठी तर आबा कधीच नाहीत. आम्ही ते स्वीकारलेलं आहे. कारण आबा राजकारण करत नाहीत तर समाजकरण करत असतात. याच ध्येयासाठी आबांची सर्व धडपड चालु आहे. त्यामुळे आम्हीपण त्यांच्या या ध्येयाच्या आड येत नाही, असे सुद्धा अर्चना पाटील यांनी म्हटले.आबांच्या कार्य पद्धती वर बोलताना पुढे अर्चना पाटील म्हणाल्या की,आबांची तळमळ ही जनतेच्या समस्या सोडविणारी असते. आबा बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर भर देत असतात.साताऱ्याला आबांच्या इथे लोकांची गर्दी होत असते.लोकं प्रश्न घेऊन येत असतात. प्रत्येक माणसाचं आबा काम करत असतात. पाच वर्षातील एक ही दिवस ते घरी नसतात. आज ते घरी आलेत,थांबलेत असे ते कधीच दिसणार नाहीत. ते सतत जनतेचे काम करत असतात. वाई खंडाळा महाबळेश्वर या तिन्ही तालुक्यात ते फिरत असतात. लोकांमध्ये संपर्क ठेवत असतात. आबा प्रत्येक तालुक्याचे



विषय हाताळत असतात.तिन्ही तालुक्यातून त्यांचं येणं जाणं सुरूच असतं.रोजचीच त्यांची पळापळ असते.मतदारसंघासाठी, जनतेच्या प्रश्नांना सोडवत असतात.आबा सकाळी दिसतील वाईत,दुपारी दिसतील खंडाळ्यात आणि रात्री अगदी दिसतील महाबळेश्वरात... एकाच दिवसांत आबा तिन्ही तालुके फिरताना दिसतात.पूर्ण मतदारसंघ हा सतत फिरत असतात.आता पर्यंत सगळं आयुष्य हे त्यांचं गाडीतच गेलेलं आहे.असे सुद्धा अर्चना पाटील यांनी सांगितले.मतदारसंघातील जनता आणि आबांचे कार्य नेहमी जनतेत घेऊन जाणाऱ्या मीडिया बद्दल सुद्धा अर्चना पाटील व्यक्त झाल्या.त्या म्हणाल्या,सर्वांची साथ आणि सर्वांचे आशिर्वाद हे आबांच्या पाठिशी असल्याने त्यांना शक्य होत आहे. आबांना जनतेचे काम करण्याची मोठी जिद्द आहे. लोकांसाठी जनतेत राहायचं हे त्यांना आवडतं. आमदार नसताना ही त्यांनी जिल्हा परिषद पंचायत समिती १२-० अशी केलेली आहे.आबा तर काम करतच असतात.परंतु तुम्ही मीडिया सुद्धा आबांचे काम जनते पर्यंत पोहचविता,हे पण महत्वाचे आहे.

मिडियाचा रोल खूप महत्वाचा असतो.असे सुद्धा अर्चना पाटील यांनी म्हटले.आ.मकरंद पाटील यांची मिसेस अर्चना पाटील या आबांच्या दृष्टीने कुटूंबांतील एक महत्वपूर्ण व्यक्ती.आबांकडून घडत असलेल्या जनसेवेच्या प्रत्येक कार्यासाठी पत्नी अर्चना पाटील यांची मोलाची साथ मिळत असते.आबा हे काय आहेत हे संवादाद्वारे अर्चना पाटील यांच्या कडून जाणून घेता आले. काही मिनिटाच्या संवादातून सुद्धा आबा हे मतदारसंघातील जनतेसाठी किती झटत असतात.हेच त्यांच्या कडूनच समजून घेता आल्याने नक्कीच आबांच्या या तळीमळीच्या कार्याला पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांच्या पत्नी अर्चना पाटील यांचाही खूप मोलाचा वाटा आहे.असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही.कारण प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एका स्त्री चा हात असतो.असे म्हटले जाते अगदी ते खरच आहे. आबांच्या बाबतीत ही तेच दिसून येते. आबांची पत्नी अर्चना पाटील ह्या खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभ्या असतात.आम्ही समाजालाच दिलेत आबा असे अर्चना पाटील यांनी म्हणणे यातच सर्व काही आलेलं आहे.

## आक्रोश पदयात्रा संदर्भात भूमिपुत्र शेतकरी संघटनेची आज सवड येथे बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** शेतमालाचे पडलेले भाव आणि सरकारचे शेतकरी विरोधी धोरण या विरोधात भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून ३१ डिसेंबर रोजी रिसोड ते वाशिम आक्रोश पदयात्रा काढण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने आज दि.२८ डिसेंबर रोजी नजीकच्या सवड येथे आढावा बैठक घेण्यात येणार आहे. सदर बैठकीस जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी व संघटनेच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन भूमिपुत्रचे नितीन गाडे यांनी केले आहे.

शेतकऱ्यांच्या शेतमालाला कवडी मोल मिळणारा भाव आणि सरकार राबवित असलेले शेतकरी विरोधी धोरण याबाबात आवाज उठवून सरकारचे लक्ष शेतकऱ्यांकडे वेधून घेण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून ३१ डिसेंबर रोजी रिसोड ते वाशिम आक्रोश पदयात्रा काढली जाणार आहे. सदर पदयात्रेचे सुनियोजित नियोजन करण्यासाठी सवड येथे आढावा सभेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २८ डिसेंबर गुरुवारला सायंकाळी साडे सहा वाजता सवड येथे बैठक होणार असून, हराळ येथे सभा होणार आहे. सदर कार्यक्रमास भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णूपंत भुतेकर मार्गदर्शन करणार आहेत. त्याअनुषंगाने जास्तीतजास्त शेतकऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन गाडे यांनी केले आहे.

## खुलताबाद येथील जिल्हा परिषद प्रशालेची इमारत होणार नामशेष

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** तालुका खुलताबाद येथील जिल्हा परिषद प्रशालेची ईमारत होणार नामशेष व उभी राहणार नविन मॉडर्न शाळेची इमारत. येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या जुन्या इमारतीचा, साहित्याचा पत्रे, खिडकी, दरवाजे लोखंडी पाईप आदी साहित्य याचा आज लिलाव करण्यात आला कारण या ठिकाणी येणाऱ्या काळात भव्यदिव्य अशी नवीन इमारत बांधली जाणार आहे शासनातर्फे आदर्श शाळा म्हणून बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद प्रशालेला दर्जा मिळाला असून आणि या ठिकाणी मॉर्डन स्कूल बांधले जाणार आहे. त्यासाठी आज या जुन्या इमारतीचा जे काही साहित्य आहे छताचे पत्रे लोखंडे अँगल खिडकी दरवाजा आदी साहित्याचा आज नियमाप्रमाणे लिलाव करण्यात आला 1952 सालि या शाळेची स्थापना झाली आहे तेव्हापासून आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी या ठिकाणी शिक्षण घेतलं ,कित्येक विद्यार्थी या इमारतीत घडले आणि आज या इमारतीचा लिलाव बघताना या शाळेत ज्या विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आहेत त्यांना खरोखर दुःखही झालं आणि




जुन्या आठवणींना उजाळा मिळाला .अशी प्रतिक्रिया सर्व जुन्या विद्यार्थ्यांची होती. मात्र तेवढाच आनंदही होता की परिसरातील या आपल्या इमारतीच्या जागेवर मॉर्डन स्कूल एक भव्य दिव्य अशी आदर्श शाळेची इमारत बांधली जाणार आहे ज्यामुळे पुढील पिढीच्या विद्यार्थ्यांना पुढे आणखी चांगले शिक्षण मिळेल त्याचा आनंद ही चेहऱ्यावर होता .नऊ लाख एकात्तर हजार रुपयांमध्ये या शाळेच्या साहित्याचा लिलाव झाला. यावेळी सरपंच आप्पाराव नलावडे, उपसरपंच कारभारी नलावडे, ग्रामसेवक बनसोड, पोपट काटकर, वसंतराव नलावडे, ज्ञानेश्वर नलावडे,पुंजाजी नलावडे, प्रकाश नलावडे, कारभारी नरवडे, संभाजी नलावडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर